सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ४ जून २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ५१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महागाई वाढणार ?

वॉशिंग्टन : अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष अजूनही मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू आहे. यातच होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक ठप्प झाली असून ही परिस्थिती जूनमध्येही कायम राहिली, तर जुलै आणि ऑगस्टमध्ये सुरू होणाऱ्या जागतिक पर्यटन हंगामापर्यंत तेल आणि नैसर्गिक गॅसचा राखीव साठा पूर्णपणे संपून जाण्याचा धोका जगासमोर आहे.शाप्रकारे, तेलाच्या तीव्र उठवड्यामुळे जग धोकादायक 'रेड झोन'मध्ये म्हणजेच तीव्र मंदीच्या काळात ढकलले जाईल ज्याचा सर्वाधिक परिणाम आशियाई देश आणि कमकुवत चलन असलेल्या अर्थव्यवस्थांवर होईल, जिथं महागाईमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडू शकते.

## कर्जमाफी फसवी : रोहित पवार

नवी मुंबई : इंधन दरवाढ आणि एकूणच वाढती महागाई यावरून शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी महायुती सरकारला मोठा इशारा दिलाय. नवी मुंबईत मोठं आंदोलन उभारण्याची घोषणा रोहित पवारांनी केली. तसंच महायुती सरकारने केलेल्या कर्जमाफीच्या घोषणेवरूनही रोहित पवारांनी हल्लाबोल केला. ही फसवी कर्जमाफी असून विनाअट कर्जमाफी करा, अशी मागणी त्यांनी केली आहे .

## मविआत धुसफूस

पुणे: पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर महाविकास आघाडीची एकजूट दाखविण्यासाठी काँग्रेस भवन येथे खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. मात्र, व्यासपीठावर ऐक्याचे संदेश दिले जात असताना बंद दाराआड झालेल्या चर्चेत काँग्रेस नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे.

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतील कटू अनुभव, काँग्रेसविरोधात उभे राहिलेले 'राष्ट्रवादी'चे उमेदवार हे मुद्दे काही नगरसेवकांनी सुप्रिया सुळे यांच्यासमोर उपस्थित केले. त्यामुळे 'मविआ'तील धुसफूस संपली नसल्याचे स्पष्ट झाले.

## बिल्डरांविरोधात गुन्हा

नाशिक : नाशिकच्या नामांकित बिल्डरविरोधात 'एमपीआयडी' अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका व्यक्तीला भूखंड विक्री केला असताना संशयितांनी संगनमताने सदर भूखंडाची परस्पर विल्हेवाट लावून विक्री करून फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले. या प्रकरणी बिल्डर जितेंद्र मोहनदास ठक्कर यांच्यासह ११ संशयितांवर नाशिकच्या सरकारवाडा पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे .

# दिल्लीत हॉटेलला लागलेल्या आगीत २१ जणांचा होरपळून मृत्यू



वृत्तसंस्था

नवी दिल्ली: दिल्लीतील मालवीय नगरातील हॉटेल फ्लरिश स्टेला बुधवारी सकाळी भीषण आग लागली. या आगीत २१ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. आगीत अनेक जण गंभीररित्या भाजले आहेत. पैकी ८ जणांची प्रकृती अतिशय नाजूक आहे. जीव वाचवण्यासाठी अनेकांनी हॉटेलच्या वरील मजल्यांवरुन उड्या टाकल्या. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. अनेक तासांच्या मेहनतीनं आग नियंत्रणात आली.

या प्रकरणात धक्कादाय उलगडा झाला आहे. या हॉटेलला दिल्ली सरकारकडून बेड अँड ब्रेकफास्ट संकल्पनेच्या अंतर्गत परवाना जारी करण्यात आला होता. त्यानुसार केवळ ६ खोल्यांची परवानगी देण्यात आली होती. पण हॉटेलमध्ये प्रत्यक्षात २५ खोल्या होत्या. म्हणजेच १९ खोल्या अतिरिक्त होत्या. इतकंच नव्हे, तर काही खोल्या बेसमेंटमध्येही तयार करण्यात आल्या होत्या. सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून हॉटेलात खोल्या तयार केल्या गेल्या होत्या. आगीत होरपळलेल्या जखमींना मॅक्स, एम्स ट्रॉमा सेंटर आणि पंडित मदन मोहन मालवीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. सकाळी नऊच्या सुमारास आग लागली. आग लागण्यामागील नेमकं कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाही. प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी याचा तपास सुरू केला आहे. सुरक्षा निकषांची अंमलबजावणी आणि परवान्यासंबंधी नियमांचं पालन यांचाही तपास सुरू करण्यात आला आहे. तपास अहवाल आल्यानंतर दोषींविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असं अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आलं आहे.

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. 'मालवीय नगरातील भीषण आगीत झालेल्या जीवितहानीबद्दल अतिशय दु:खी आहे. माझ्या सहवेदना मृतांच्या कुटुंबियांसोबत आहेत. या संकटातून, दु:खातून बाहेर पडण्याचं बळ त्यांना मिळो. जखमींना लवकरात लवकर आराम पडावा यासाठी मी प्रार्थना करते,' अशा भावना मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सोशल मीडिया पोस्टमधून व्यक्त केल्या आहेत.

दिल्ली सरकार परिस्थितीवर नजर ठेवून आहे. दुर्घटनेतील पीडित कुटुंबांना सर्व प्रकारची वैद्यकीय मदत आणि सहाय्य दिलं जात आहे. या दु:खाच्या क्षणी, संकट समयी दिल्ली सरकार पीडित कुटुंबासोबत भक्कमपणे उभं आहे. पीडित कुटुंबांना आवश्यक मदत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असं गुप्ता यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

# सोन्याच्या दरात घसरण

## भाव १ लाखांच्या खाली येणार? तज्ज्ञांनी व्यक्त केला अंदाज



तभा वृत्तसेवा

मुंबई : गेल्या काही आठवड्यांपासून सोन्याच्या दरांमध्ये मोठी चढ-उतार पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी विक्रमी पातळी गाठल्यानंतर आता सोन्याच्या किमतींमध्ये हळूहळू घसरण होताना दिसत आहे. त्यामुळे आगामी काळात सोन्याचा भाव १ लाख रुपयांच्या खाली येणार का, याबाबत ग्राहक आणि गुंतवणूकदारांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारातील बदलांचा सोन्याच्या दरावर थेट परिणाम होत आहे. अमेरिकन डॉलर मजबूत होणे, व्याजदरांतील बदल, विविध देशांच्या केंद्रीय बँकांची आर्थिक धोरणे आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील घडामोडी यामुळे सोन्याच्या किमतींवर दबाव निर्माण झाला आहे.

याशिवाय, जागतिक शेअर बाजारात वाढ होत असल्याने अनेक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीऐवजी इतर पर्यायांकडे वळत आहेत. परिणामी, सोन्याची मागणी काही प्रमाणात कमी झाली असून त्याचा परिणाम दरांवर दिसून येत आहे. देशातील विविध शहरांमध्ये २४ कॅरेट सोन्याच्या किमतींमध्ये अलीकडच्या काळात घट झाली आहे. शहरानुसार कर आणि इतर शुल्कांमुळे दरात थोडाफार फरक असला तरी ग्राहकांना पूर्वीच्या तुलनेत काहीसा दिलासा मिळाला आहे. बाजार तज्ज्ञांच्या मते, जागतिक परिस्थिती अनुकूल राहिल्यास आणि डॉलरच्या तुलनेत रुपया स्थिर राहिल्यास सोन्याच्या दरात आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. मात्र भाव १ लाख रुपयांच्या खाली जातील की नाही, हे आगामी आर्थिक घडामोडींवर अवलंबून असेल. दीर्घकालीन गुंतवणूक करणाऱ्यांसाठी सध्याचा काळ अनुकूल मानला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, एकरकमी गुंतवणूक करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने सोने खरेदी केल्यास बाजारातील चढ-उताराचा धोका कमी होऊ शकतो. त्यामुळे सध्याच्या घसरणीचा फायदा घेण्याचा सल्ला जाणकारांकडून दिला जात आहे.

# पावसाचा पॅटर्न बदलणार, दुष्काळ अन् उष्णतेची लाट!

## अल निनोचा प्रभाव वाढवणार जगाचं टेन्शन, हवामान संघटनेची चिंताजनक भविष्यवाणी



तभा वृत्तसेवा

मुंबई: देशभरात यंदा उष्णतेच्या लाटेने नागरिकांना हैराण केल्याचं पाहायला मिळालं. मान्सूनच्या आगमनादेखील विलंब झाल्याने उष्णतेने होरपळलेल्या नागरिकांना दिलासा मिळण्यास आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने शेतकरी चिंतेत असतानाच जागतिक हवामान संघटनेकडून (थचज) चिंता वाढवणारी माहिती देण्यात आली आहे. जगभरात वातावरण बदलामुळे मोठं संकट निर्माण झालं असून अल निनोच्या सक्रियतेबाबत वैज्ञानिकांकडून गंभीर इशारा देण्यात आला आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, अल निनोचा प्रभाव वेगाने वाढण्याची शक्यता असून परिणामी मान्सून पॅटर्न बदलणार आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत अल निनोचा प्रभाव तयार होण्याची शक्यता ८० टक्क्यांपर्यंत असून नोव्हेंबर महिन्यापर्यंत अल नीनोचा प्रभाव पाहायला मिळू शकतो. वातावरणीय बदलामुळे अल निनोचा परिणाम अधिकच तीव्रतेने जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे काही भागांमध्ये दुष्काळ, उष्णतेची लाट तर काही ठिकाणी अतिवृष्टी आणि पुराचा सामना करावा लागू शकतो.

जनसामान्यांच्या जीवनावर थेट परिणाम करणारा अल निनो हा दर दोन ते सात वर्षांनी तयार होणारा वातावरणाचा पॅटर्न आहे. या स्थितीत प्रशांत महासागराचे पाणी गरम होते, ज्यामुळे जागतिक तापमानवाढ होते आणि पावसाचा पॅटर्नही बदलून जातो.

शास्त्रज्ञांनी केलेल्या दाव्यानुसार, पृथ्वीचे तापमान अलीकडच्या काळात १.३ अंश सेल्सिअसने वाढलं असून यामुळे अल निनोचा प्रभाव आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. अल निनो आणि तापमानवाढीमुळे उष्णतेची लाट, दुष्काळ, अतिवृष्टी आणि जंगलांमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होण्याचा धोका आहे.

दरम्यान, यंदा अल निनोचा प्रभाव मान्सूनच्या आगमनावर झालेला असतानाच पुढील वर्षी आणखी विदारक परिणाम पाहायला मिळू शकतात. २०२७ हे आतापर्यंतचं सर्वांत उष्णतेचं वर्ष ठरण्याची शक्यता जागतिक हवामान संघटनेकडून वर्तवण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील ३ मोठ्या विद्यापीठांचे 'फॉरेन्सिक ऑडिट' होणार

## आर्थिक व्यवहारांची होणार सखोल चौकशी



तभा वृत्तसेवा

पुणे: राज्यातील तीन प्रमुख विद्यापीठांचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एसएनडीटी महिला विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजाची सखोल तपासणी केली जाणार आहे. विद्यापीठांच्या महसूल, खर्च, निधी व्यवस्थापन, परीक्षा, प्रवेश, संशोधन आणि प्रशासकीय कामकाजाची सखोल पडताळणी करण्यात येणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या २०१७-१८ ते २०२५-२६ या आठ वर्षांच्या, तर एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीचे फॉरेन्सिक ऑडिट करण्यात येणार आहे.

पुणे विद्यापीठातील आर्थिक व्यवहार, विविध प्रकल्पांवरील खर्च, खरेदीप्रक्रिया आणि प्रशासकीय निर्णयांची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांकडून सातत्याने केली जात होती. त्यानंतर सरकारने 'फॉरेन्सिक ऑडिट'चा निर्णय घेतला आहे. याबाबतचे सविस्तर परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केले असून, पुढील कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना कळविण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठाच्या फॉरेन्सिक ऑडिटची जबाबदारी 'मुकुंद एम. चितळे अँड कंपनी'कडे सोपविण्यात आली असून, त्यांना अहवाल सादर करण्यासाठी ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

## गर्लफ्रेंडला दिले चोरीचे गिफ्ट

तभा वृत्तसेवा

नागपूर : गर्लफ्रेंडच्या वाढदिवसानिमित्त महागडे गिफ्ट देण्यासाठी दोन अल्पवयीन मुलांनी चोरीचा मार्ग अवलंबल्याची धक्कादायक घटना नागपूरातील अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे.

# वयाच्या ६१व्या वर्षी आमिर खान चढणार बोहल्यावर !

तभा वृत्तसेवा

मुंबई - आमिर खान आणि त्याची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅट लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा सोशल मीडियावर सुरू झाल्या आहेत. आमिर आणि गौरी गेल्या काही वर्षांपासून एकमेकांना डेट करत आहेत. गेल्या वर्षी आमिर खाननं आपल्या ६० व्या वाढदिवशी आपल्या गर्लफ्रेंडची ओळख माध्यमांसोबत करून दिली. त्यामुळे आता अभिनेता वयाच्या ६१ व्या वर्षी तिसरं लग्न करणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

एका रिपोर्टनुसार, आमिर आणि गौरी घरीच एक साध्या आणि खासगी पद्धतीनं लग्न करणार असल्याचं म्हटलं जातंय. लग्न समारंभाला केवळ त्यांचे कुटुंबीय आणि मोजकेच जवळचे मित्र उपस्थित राहतील. या जोडप्याच्या जवळच्या एका सूत्रानं सांगितलं की , 'आमिर आणि गौरी काही वर्षांपासून एका कुटुंबाप्रमाणे एकत्र राहत आहेत. ते सुखी आयुष्य जगत आहेत आणि आता आपल्या कुटुंबाच्या उपस्थितीत, हे नातं पुढे घेऊन जाण्याचा त्यांनी निर्णय घेतलाय.' ५ जुलै रोजी आमिर खान आणि गौरी लग्न करणार आहेत. या प्रसंगी दोन्ही कुटुंबं एकत्र येतील. बॉलिवूड हंगामाला दिलेल्या मुलाखतीमध्ये आमिरनं गौरीसोबत एकत्र राहण्याबद्दल मनमोकळेपणानं चर्चा केली होती. अभिनेत्यानं सांगितलेलं की, 'क्र्रिी झिरींशश्र' हा चित्रपट प्रदर्शित झालेला त्यादरम्यानच दोघांनी एकत्र राहण्यास सुरुवात केलेली. लग्नाचा काही विचार आहे का? असं विचारलं असता आमिर म्हणालेला, आम्ही सिरीयस रिलेशनशिपमध्ये आहोत. आमची मनं जोडली गेली आहेत, आम्ही आधीच एकमेकांना पती-पत्नी मानलंय. त्यामुळे हे नातं पुढे घेऊन जाण्याचा निर्णय कालानुरूप घेतला जाईल, असं अभिनेत्यानं सांगितलं.




# मान्सूनसाठी समुद्र लॉकडाऊन मोडमध्ये, रायगड किनाऱ्यावर ६ हजार बोटी विसावल्या; मासेमारीला पुढील दोन महिने ब्रेक



तभा वृत्तसेवा

रायगड: पावसाळा तोंडावर आहे. मान्सूनचे आगमन होणार आहे. त्याच कारणाने आता खोल समुद्रातल्या मासेमारीवर बंदी आणण्यात आली आहे. मासेमारी बंदीचा कालवळी हा १ जून रोजीपासूनच सुरु झाला आहे. त्या पार्श्र्वभूमीवर आता जिल्ह्यातल्या एकूण ६ हजार १२९ मच्छिमारांच्या बोटी रायगड समुद्रकिनारी विसावल्या आहेत. मच्छिमारी बंदीचा कालवाधी ३१ जुलैपर्यंत असणार आहे. पुढील मासेमारीचा कालावधी १ ऑगस्ट हा असणार आहे, म्हणजे मच्छिमार त्यांच्या बोटी पुन्ही खोल समुद्रात नेऊ शकतील. मासेमारी सुरु करतील.

रायगड जिल्ह्यातल्या ४ हजार २९३ मोटारवर चालणाऱ्या आणि यांत्रिक बोटी, याशिवाय १८३६ बिगर-मोटारचलित बोटीदेखील समुद्रात जाणार नाहीत, अशी माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने दिली आहे. यासगळ्याचा परिणाम निश्र्चितच मासेमारीच्या व्यवसायावर होईल आणि व्यवहार मंदावतील.प्रत्येक वर्षी मान्सूनच्या आगमनाआधीच मासेमारी बंदी लागू केली जाते. समुद्रात या काळात वादळी वारे, उंच लाटा आणि धोकादाय हवामान निर्माण होत असते. त्याचा परिणाम मच्छिमारांच्या सुरक्षेवरही होऊ शकतो, त्यादृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला गेला आहे.

अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा, उरण आणि पनवेल परिसरातली गावे मोठ्या प्रमाणात मत्स्यव्यवसायावर चालतात. हजारो कुटुंबांचे आर्थिक गणितं याच व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातले हे मच्छिमार हे बंदीच्या काळात पर्यायी कामांकडे आपला मोर्चा वळवताना पाहायला मिळतात.

काहीजण या काळात बोटींची दुरुस्तीची कामे, जाळ्यांची निगा, रंगरंगोटी अशा स्वरुपाची कामेही करतात. मासेमारी बंदी असल्यामुळे बाजारामध्यही चित्र बदलते. ताज्या मासळीची आवक कमी होते. त्यामुळे मासळीचे दर वाढण्याची शक्यताही निर्माण होते. बंदी काळात कोळंबी, सुरमई, बांगडास पापलेट यांसारख्या मासळींची मागणी प्रचंड वाढते. या काळात ग्राहकांना इतर जिल्ह्यातल्या मासळीवर भागवावे लागते, तसेच गोठवलेली मासोळ्यांची विक्रीही या कालावधीत होते. दरम्यान, मत्स्यव्यवसाय विभागाने मच्छिमारांना बंदी काळातील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केलेले आहे. या काळात नियम तोडणाऱ्या बोटींवर कडक कारवाई केली जाणार आहे, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. समुद्रकिनारी गस्त वाढवली जाणार आहे. संबंधित भागात विभागांमार्फत वेळोवेळी पाहणी केली जाणार आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पारधी वस्त्यांवर पाणीटंचाई; ८ जूनला सत्याग्रह आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ जून -**
तालुक्यातील शिराढोण, नागुलगाव, कोथळा, मंगरूळ (कोथळा), कन्हेरवाडी, पाटी आदी गावांलगत असलेल्या पारधी समाजाच्या वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. स्वच्छ पाणी व जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी करूनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याबाबत मानवी हक्क अभियान व श्रमिक मानवाधिकार संघाच्या वतीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती कळंब यांना निवेदन देण्यात आले आहे. तात्काळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अन्यथा ८ जून २०२६ रोजी गटविकास अधिकारी यांच्या दालनात तीव्र सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनावर संस्थापक बजरंग ताटे, जिल्हाध्यक्ष माया शिंदे, सुमन काळे, सुनील गायकवाड आणि आकाश राजहंस यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### बसवराज पाटील यांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, ३ जून -**
विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर महायुतीचे उमेदवार तथा माजी मंत्री बसवराज पाटील यांनी तुळजापूर येथे येऊन आई श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेत विजयासाठी आशीर्वाद मागितले. यावेळी त्यांनी विधिवत पूजा-अर्चा करून आगामी निवडणुकीत यश मिळावे व जनसेवेची अधिक ताकद लाभावी, अशी प्रार्थना केली. त्यांच्या समवेत कुटुंबीय, मुरूमचे नगराध्यक्ष बापूराव पाटील, युवा नेते शरण पाटील तसेच कार्यकर्ते व सहकारी उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर कुलस्वामिनीचे दर्शन घेण्याची परंपरा जपत त्यांनी तुळजाभवानी मातेच्या चरणी माथा टेकला.



### श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी तामोरे

**तुळजापूर, ३ जून -**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे अपर जिल्हाधिकारी उपेंद्र गोविंद तामोरे यांनी २ जून २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. सन २००२ बॅचचे उपजिल्हाधिकारी असलेल्या तामोरे यांना महसूल, नियोजन आणि प्रशासकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आहे. तुळजाभवानी मातेच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात असून, प्रस्तावित विकासकामांचे नियोजन, समन्वय व प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यांचा अनुभव उपयुक्त ठरणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाविक सुविधा, मंदिर प्रशासन व विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



### अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**उमरगा, ३ जून -**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त बलसुर येथे शेंडगे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, उमरगा यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आयोजित या शिबिराचा १०८ रुग्णांनी लाभ घेतला. बुधवारी जय मल्हार चौक येथील धनगर समाज मंदिरात पार पडलेल्या शिबिरात बी.पी., शुगर, ईसीजी, दंतचिकित्सा व वजन तपासणी करण्यात आली. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांना मोफत वैद्यकीय सल्ला दिला. शिबिराच्या प्रारंभी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत ग्रामस्थ, महिला, युवक व समाजबांधव सहभागी झाले होते. यावेळी डॉ.आर.डी. शेंडगे यांच्यासह विविध मान्यवर, ग्रामस्थ आणि वैद्यकीय पथक उपस्थित होते.

## महाद्वार परिसरातील व्यापाऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**तीन फूट फूटपाथ व पाच फूट सायवानला परवानगी देण्याची मागणी; महाद्वार प्रवेश पूर्ववत सुरु करण्याचे आवाहन**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ जून -**
श्री तुळजाभवानी मंदिराच्या महाद्वार परिसरातील व्यापाऱ्यांनी तीन फूट फूटपाथ व पाच फूट सायवान उभारण्यास परवानगी देण्यात यावी तसेच भाविकांसाठी महाद्वारातून प्रवेश पूर्ववत सुरू करण्यात यावा या मागण्यांसाठी दुकाने बंद ठेवून मंदिर प्रशासकीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

व्यापाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तुळजापूर नगर परिषदेने राबविलेली अतिक्रमण निर्मूलन मोहीम योग्य व कौतुकास्पद असून अनेक वर्षांपासून अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेल्या महाद्वार चौकाला मोकळा श्वास मिळाला आहे. याबद्दल नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांचे अभिनंदनही करण्यात आले आहे.

मात्र, अतिक्रमणमुक्त मोहीम कायम ठेवताना येथील व्यापाऱ्यांच्या अडचणींचाही विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. जागेच्या मर्यादा लक्षात घेऊन व्यापाऱ्यांना तीन फूट फूटपाथ वापरण्याची परवानगी द्यावी. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मालाचे संरक्षण आणि आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पाच फूट सायवान उभारण्यास परवानगी देण्यात यावी, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय मंदिर संस्थानने विकासकामांच्या कारणास्तव भाविकांसाठी बंद केलेला महाद्वार प्रवेश पूर्ववत सुरू करावा. महाद्वारातून भाविकांची ये-जा सुरू झाल्यास व्यापारी आणि भाविक दोघांनाही त्याचा लाभ होईल, असेही व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन व्यापाऱ्यांना सहकार्य करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असून निवेदनावर महाद्वार परिसरातील व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आंदोलनामुळे महाद्वार परिसरात काही काळ व्यापारी व्यवहार ठप्प राहिले होते.

## कायमस्वरूपी कामाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**
कायमस्वरूपी काम देण्याचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय तरुणीला मोटारसायकलवरून निर्जन ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित २२ वर्षीय महिला (नाव व गाव गोपनीय) हिला दि.३१ मे २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास एका तरुणाने कायमस्वरूपी काम देण्याचे आश्वासन देत मोटारसायकलवर बसवून नेले. त्यानंतर तिला एका मोकळ्या व अंधाऱ्या पटांगणात नेऊन धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

घटनेनंतर आरोपीने पीडितेला कोणालाही काही सांगू नकोस, तुला कायमस्वरूपी सांभाळ करतो, असे सांगून तिला मोटारसायकलवरून रस्त्यावर सोडून तेथून पसार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पीडित महिलेने दि.२ जून २०२६ रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## गाडीत झोपलेल्या दाम्पत्याच्या गळ्यातील सोन्याचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**
धाराशिव शहरातील गोकर्ण पेट्रोलपंप परिसरात उभ्या असलेल्या वाहनात झोपलेल्या दाम्पत्याच्या गळ्यातील सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शाहनवाझ चौदमिया शेख (वय ५४, रा. अहमदनगर) हे दि. २ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे १२.४५ वाजण्याच्या सुमारास धाराशिव येथील गोकर्ण पेट्रोलपंप शेजारील आर्यन हॉटेलसमोरील मोकळ्या जागेत आपली गाडी उभी करून पत्नीसह झोपले होते. यावेळी वाहनाची एक काच अर्धवट उघडी असल्याचा फायदा घेत अज्ञात दोन व्यक्तींनी गाडीमध्ये हात घालून फिर्यादी यांच्या पत्नीच्या गळ्यातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसकावून नेले आणि घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेनंतर शाहनवाझ शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करीत आहेत.

## देह व्यापाराचा पर्दाफाश; स्पा सेंटरवर कारवाई

**धाराशिव पोलीसांची धडक कारवाई; पाच महिलांची सुटका**





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**
धाराशिव शहरातील एका स्पा सेंटरवर पोलिसांनी धडक कारवाई करत अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (पीआयटी) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत पाच महिलांची सुटका करण्यात आली असून संबंधित व्यवस्थापक, चालक व इतर संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक रीतु खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. शहरातील ओरा स्पा सेंटर येथे व्यावसायिक लैंगिक शोषण सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचला. कारवाईदरम्यान पंटरचा वापर करून माहितीची खातरजमा करण्यात आली. त्यानंतर शासकीय पंचांच्या उपस्थितीत छापा टाकून संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. तपासात स्पा सेंटरमध्ये अनैतिक व्यापार सुरू असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत पोनि. एम.एन. शेळके, पोउपनि. सोनटक्के, पोअं. माने, दूधभाते, कंदळे, नाईकवडी, किवंडे, केवके तसेच मपोह. पुरी आणि जाधव यांनी सहभाग घेतला.

छाप्यामध्ये एकूण पाच महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांना पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे.

### अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम...

धाराशिव जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची जबाबदारी पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्याकडे सोपविण्यात आली असून बेकायदेशीर व अनैतिक कृत्यांवर कठोर नजर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना परंड्यात अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ जून -**
जनसामान्यांचे आधारस्तंभ, माजी केंद्रीय मंत्री आणि लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त परंडा येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. भाजपा संपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. गोपीनाथ मुंडे यांनी ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांसाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक योगदानाची आठवण करून देत कार्यकर्त्यांनी त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, न.प.चे उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, तालुका उपाध्यक्ष डॉ. अमोल गोफणे, हरी शिंदे, जयदेव गोफणे, विकास कुलकर्णी, धनाजी गायकवाड, अमोल केमदारणे, ॲड. जहीर चौधरी, साहेबराव पाडुळे, निशिकांत क्षिरसागर, बाळासाहेब गिरी, नागेश गर्जे, नागेश शिंदे, प्रा. विलास गायकवाड, शिवाजीराव पाटील, श्रीकृष्ण शिंदे, तुषार नेटके, रामदास गुडे, जयंत सायकर, योगेश डांगे, अभिषेक चोबे, रामेश्वर चोबे, रवीकुमार गरड, शहर सरचिटणीस धनंजय काळे, तुषार कोळेकर, समाधान कोळेकर, सुखदेव इंगळे, संपत्ती भोळे, गणेश होरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरमाळा पोलीस ठाण्याचा प्रभारी पदभार यशवंत घोडके यांच्याकडे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३ जून -**
धाराशिव जिल्ह्यातील महत्त्वाच्या येरमाळा पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदाची जबाबदारी सहाय्यक पोलीस निरीक्षक यशवंत घोडके यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक संग्राम भालेराव यांच्यावर प्रशासकीय कारवाई झाल्यानंतर घोडके यांनी पदभार स्वीकारला.



येरमाळा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात वाशी तालुक्यासह अनेक गावे येत असून, कायदा व सुव्यवस्था राखणे, वाढत्या वाद-विवादांवर नियंत्रण ठेवणे, गुन्हेगारी प्रवृत्तींवर वचक निर्माण करणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे ही महत्त्वाची जबाबदारी आता त्यांच्यावर आली आहे.

पोलीस खात्यातील अनुभवाच्या बळावर घोडके हे ठाण्याचा कारभार प्रभावीपणे सांभाळतील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## महाद्वारातून सर्व भाविकांना समान प्रवेश द्या

**शिवबाराजे प्रतिष्ठानचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; दुजाभाव केल्याचा आरोप**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ जून -**
श्री तुळजाभवानी मंदिरातील सुरू असलेल्या जिर्णोद्धार व विकासकामांच्या पार्श्वभूमीवर महाद्वारातून सर्वसामान्य भाविकांचा प्रवेश बंद करून केवळ व्हीआयपी व पेड दर्शनधारकांना प्रवेश दिला जात असल्याचा आरोप करत शिवबाराजे प्रतिष्ठानच्या वतीने मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना निवेदन देण्यात आले. तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांच्यामार्फत हे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, मंदिराच्या जिर्णोद्धाराचे कारण पुढे करून सर्वसामान्य भाविकांना महाद्वारातून प्रवेश नाकारण्यात येत असून त्यांना बिडकर पायऱ्या मार्गे मंदिरात प्रवेश दिला जात आहे. हा मार्ग तुलनेने लांब असून सुमारे २५० पायऱ्या चढाव्या लागत असल्याने लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुसरीकडे व्हीआयपी दर्शन व पेड दर्शन पासधारक भाविकांना मात्र महाद्वारातून प्रवेश दिला जात असल्याने मंदिर प्रशासनाकडून भाविकांमध्ये दुजाभाव केला जात असल्याचा आरोप प्रतिष्ठानने केला आहे.

महाद्वारातून भाविकांचा प्रवेश बंद झाल्याने परिसरातील व्यापारी वर्गावरही आर्थिक परिणाम होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता सर्व भाविकांना महाद्वारातूनच प्रवेश देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच सर्वसामान्य भाविकांना महाद्वारातून प्रवेश दिला जात नसेल तर कोणत्याही राजकीय नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना किंवा व्हीआयपी व्यक्तींनाही त्या मार्गाने प्रवेश देण्यास शिवबाराजे प्रतिष्ठानतर्फे तीव्र विरोध करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर शिवबाराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन साळुंके यांच्यासह सुदर्शन वाघमारे, विकी वाघमारे, लखन छत्रे, मंगेश डेरके, किरण कदम आणि राहुल घाडगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## गाव तिथे शाखा, घर तिथे शिवाचे मावळे घडविणार : बताले

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ जून -**
गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवाचे मावळे तयार करून संघटना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे नूतन धाराशिव जिल्हाध्यक्ष संजय बताले यांनी पत्रकार परिषदेत दिली.





शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी धाराशिव, तुळजापूर, लोहारा आणि उमरगा येथील विद्यमान कार्यकारिणी बरखास्त करून दि. ३१ मे २०२६ रोजी नळदुर्गचे माजी नगरसेवक तथा जय हिंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय बताले यांची धाराशिव जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली. याचवेळी सतीश पाटील (हिप्परगा ताड) यांची जिल्हा उपाध्यक्ष, रविराज मुळे (अणदूर) यांची तुळजापूर तालुका अध्यक्ष आणि प्रशांत बोधणे (सलगरा दिवटी) यांची तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

नियुक्तीनंतर २ जून रोजी नळदुर्ग येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संजय बताले म्हणाले की, शिवा संघटना ही कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधील नसून समाजहितासाठी कार्य करणारी संघटना आहे. लिंगायत समाजाच्या विविध समस्या, अडचणी आणि प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी संघटना सक्रियपणे काम करणार आहे.

ते पुढे म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यात गावागावांत संघटनेच्या शाखा स्थापन करून युवकांना संघटित करण्यावर भर दिला जाणार आहे. गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवाचे मावळे हा संकल्प प्रत्यक्षात उतरवून संघटना अधिक मजबूत करण्यात येणार आहे. संजय बताले यांनी लिंगायत समाजासाठी स्मशानभूमीचा मुद्दाही उपस्थित केला. अनेक गावांमध्ये समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध नसल्याचे सांगत प्रत्येक गावात लिंगायत समाजासाठी स्मशानभूमी उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी नमूद केले. नळदुर्ग येथे गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या बसवसृष्टी प्रकल्पाच्या उभारणीबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट केली.

संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करून नळदुर्ग येथे भव्य बसवसृष्टी उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. धाराशिव जिल्ह्यातील लिंगायत समाजातील युवक, नागरिक आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने शिवा संघटनेत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या पत्रकार परिषदेला संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेटे, राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ताभाऊ खंकरे, राज्य सरचिटणीस धनुकुमार शिवणकर, नागेश चौगुले, जिल्हा उपाध्यक्ष सतीश पाटील, तालुका अध्यक्ष रविराज मुळे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत बोधणे यांच्यासह नळदुर्ग, अणदूर, दहिटणा परिसरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी कर्जमाफीचा निर्णय स्वागतार्ह -आ.अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेला कर्जमाफीचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असून त्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केली आहे.

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून गेल्या काही वर्षांत नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेऊन घेतलेला हा निर्णय त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारा ठरेल, असे आमदार खोतकर यांनी म्हटले आहे.

या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होऊन त्यांना नव्या जोमाने शेती करण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच कृषी क्षेत्राच्या विकासालाही चालना मिळणार आहे. शेतकरी कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडवणीस, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथरावजी शिंदे , मा. ना. श्रीमती सुनेत्रा ताई पवार आणि राज्य सरकारचे त्यांनी अभिनंदन करत या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत केले आहे.

# घनकचरा वर्गीकरण सक्तीचे; नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई होणार

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत कचऱ्याचे स्रोतस्थानी वर्गीकरण करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दंडात्मक कारवाईचे अधिकार प्रदान करण्यात आले असून, नागरिक, व्यावसायिक आस्थापना आणि मोठे कचरा उत्पादक यांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रशासनाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातून निर्माण होणारा कचरा चार स्वतंत्र प्रकारांत वर्गीकृत करून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे द्यावा. यामध्ये ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा आणि विशेष देखभाल/घातक कचरा यांचा समावेश आहे. कचरा मिसळून दिल्यास अथवा नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते.

कचऱ्याचे वर्गीकरण का आवश्यक आहे ?
कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केल्यास पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे सुलभ होते. यामुळे लँडफिलमध्ये जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन पर्यावरण संरक्षणास मदत होते. तसेच शहर आणि ग्रामीण भागातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक परिणामकारक बनते. मोठ्या कचरा उत्पादकांवर विशेष जबाबदारी घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार दररोज मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, कार्यालये, शैक्षणिक संस्था, हॉटेल्स, रुग्णालये, बाजारपेठा, गृहसंकुले आणि इतर व्यावसायिक आस्थापनांना ईश्रिज्ञ थरींश ऋश्रपशीरीीं (इथऋ) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. अशा संस्थांनी त्यांच्या परिसरातच ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रक्रिया यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे. नियमांनुसार दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक कचरा ज्यांचे क्षेत्र २० हजार स्के.मी आहे अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाणी वापर करणाऱ्या संस्थांनी ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करूनच स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सुपूर्द करणे अपेक्षित आहे. जे इथऋ एपींळीं निर्देशांचे पालन करणार नाहीत त्यांचे पाणी / वीज पुरवठा थांबविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ तसेच न्यायालयीन निर्देशांचे पालन करून स्वच्छ, निरोगी आणि प्रदूषणमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. ओला कचरा : स्वयंपाकघरातील अवशेष (भाज्यांचे देठ, पाने, साल), शिळे अन्न, फळांच्या साली व बिया, गवत, बागेतील कचरा, फुले व पाने, चहा व कॉफीचा चोथा, पशुखाद्य अवशेष

सुका कचरा : प्लास्टिक (बाटल्या, पिशव्या, खेळणी), कागद (वर्तमानपत्र, पुस्तके, पुठ्ठा), धातू (ॲल्युमिनियम, स्टील, लोखंड), काच (बाटल्या, तावदाने), लाकडी वस्तू (फर्निचर, बांबू), कापड व चामडे, जुने कपडे, शूज व इतर वस्तू

सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड, डायपर, फेस मास्क, बँडेज, सॅनिटरी वापरातील वस्तू , संसर्गजन्य पदार्थांचे अवशेष,

विशेष देखभाल / घातक कचरा : बॅटऱ्या (मोबाईल, रिचार्जेबल), ट्यूबलाईट व बल्ब, पेंट, थिनर व रासायनिक पदार्थ, कीटकनाशके व त्यांचे अवशेष, ई-कचरा (जुने फोन, संगणक भाग), सॅनिटायझर व इतर धोकादायक पदार्थ

घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी अधिक कडक होणार असून, प्रत्येक नागरिकाने घरातूनच कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची सवय लावणे काळाची गरज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## संक्षिप्त

### चक्रीवादळाचा श्रीष्टी तांड्यांला तडाखा; तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी – महेश राठोड




**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

काल रात्री परिसरात झालेल्या अचानक आणि तीव्र चक्रीवादळाने श्रीष्टी तांडा गावाला पुरते झोडपून काढले असून, गावात आणि शेतशिवारात मोठ्या प्रमाणावर अतोनात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामस्थ आणि शेतकरी हवालदील झाले असून, प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करावेत आणि भरपाई द्यावी, अशी मागणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शालेय समिती अध्यक्ष महेश राठोड यांनी केली आहे. काल रात्री अचानक सुटलेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या चक्रीवादळाने श्रीष्टी तांडा (बा.ना) येथील जनजीवन विस्कळीत केले. या वादळाचा मोठा फटका स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला बसला असून, शाळेचे संपूर्ण किचन शेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणारा स्टेज जमीनदोस्त झाला आहे. सुदैवाने ही घटना रात्री घडल्याने मोठी जीवितहानी टळली, मात्र शाळेचे प्रचंड भौतिक नुकसान झाले आहे.वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, गावाला वीजपुरवठा करणारे अनेक विजेचे खांब (लाईट पोल) उन्मळून पडले आहेत, ज्यामुळे संपूर्ण गावातील वीजपुरवठा खंडित झाला असून गाव अंधारात बुडाले आहे. अनेक गरिबांच्या घरांवरील पत्रे वाऱ्याने उडून गेल्याने नागरिकांचे संसार उघड्यावर आले आहेत.गावातील शेतकऱ्यांचेही या चक्रीवादळामुळे अतोनात नुकसान झाले आहे. काढणीला आलेली केळी, ऊस, आणि पपईच्या बागा भुईसपाट झाल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांनी शेतात बसवलेले महागडे सोलर पॅनेल्स आणि शेतातील विजेचे खांबही कोलमडून पडल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आधीच संकटात असलेल्या बळीराजाचे या वादळाने कंबरडेच मोडले आहे.

काल रात्री झालेल्या चक्रीवादळाने आमच्या श्रीष्टी तांडा गावातील शाळा, घरे आणि शेतीचे अतोनात नुकसान केले आहे. विजेचे खांब पडल्याने गाव अंधारात आहे. महसूल आणि कृषी विभागाने पंचनामा केला असून काही नागरिकांचा पंचनामा राहिलेला आहे तरीही तातडीने गावात येऊन सर्व नुकसानीचे पंचनामे करावेत आणि पीडित ग्रामस्थ व शेतकऱ्यांना तात्काळ शासकीय नुकसानभरपाई मिळवून द्यावी, ही आमची प्रशासनाकडे आग्रही मागणी आहे.
– महेश राठोड (अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती, जि.प. प्रा. शाळा, श्रीष्टी तांडा)

### विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांसाठी 'बेनेफिशियरी सत्यापन ॲप'द्वारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना आता 'बेनेफिशियरी सत्यापन प (इड-)'च्या माध्यमातून डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनांतील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आदी योजनाद्वारे वृध्द, विधवा, निराधार महिला-पुरुष, दिव्यांग व इतर गरजु लाभार्थ्यांना दरवर्षी हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संबंधित आर्थिक वर्षात लाभार्थ्यांनी प्रमाणपत्र सादर केल्यास बंद करण्यात आलेले अर्थसहाय्य पुन्हा सुरू करण्याची तरतूद शासनाने केली आहे.

# जालना-नांदेड समृध्दी महामार्गाच्या इंटरचेंज मुळे वाटुर फाटा येथिल जमिनींचे भाव वाढणार

**तभा वृत्तसेवा**
**परतुर । सुरेश कवडे पाटील**

महाराष्ट्र शासनाचा ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या,जालना- नांदेड समृध्दी महामार्गाचे काम जलद गतिने सुरू असुन, जालना जिल्ह्यातील ६० किलोमीटरवर असलेले परतुर व मंठा तालुक्याच्या मध्यभागी येणारे वाटुर गांवामधे,वाटुर - परतुर रोडवर या समृध्दी महामार्गाचा पहीला इंटरचेंज येणार असल्याची चर्चा झाली आहे,तसा नकाशा सुध्दा सोशल मिडिया मधे व्हायरल होत आहे,वाटुर या गावाला मंठा व परतुर तालुक्यातील असंख्य गांवे लगत असल्याने परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीची उपबाजार पेठ वाटुर येथे आहे,मंठा व परतुर तालुक्या



पेक्षा ही मोठा बाजार मंगळवार च्या दिवशी वाटुर येथे भरतो.

वाटुर-परतुर रोडवर समृध्दी महामार्गाचा इंटरचेंज होणार असल्याने, इंटरचेंज लगत भरपूर प्लॉट ,जमिनीची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे.वाटुर-परतुर रोड व समृध्दी इंटरचेंज होत असल्याने दोन रोड या शेजारच्या जमिनीला येत आहेत.त्यामुळे मोठं मोठे उद्योजक, नोकरदार, पेट्रोल पंप,हॉस्पीटल, हॉटेल,मॉल, सिएनजी पंप, चार्जिंग पंप, यासाठी वाटुर-परतुर या रोडवर,रोडटच प्लॉट,जमिन घेण्यासाठी येत आहेत.

समृध्दी महामार्गाचे वाटुर येथे मरूम भरण्याचे काम सुरू असुन,बरेच काम पुर्णतः च्या मार्गाने होत असल्याचे दिसून येते आहे.

समृध्दी महामार्गामुळे वाटुर येथिल जिवनमान उद्योग व्यवसाय उंचावणार असल्याने भविष्यातली पक्की गुंतवणूक म्हणून या भागाकडे नागरीकांचा ओढा वाढला आहे.समृध्दी महामार्गाच्या इंटरचेंज मुळेच वाटुर येथिल प्लॉट,जमिनींचे भाव वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# श्रीमती जे.बी.के. विद्यालयाच्या दोन अग्नी विरांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी । प्रतिनिधी**

टेंभूर्णी येथील नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीमती.जे. बी.के.विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयातील शंतनू भागवत गोरे, व तुषार ज्ञानेश्वर गोरे या दोन माजी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यासातील मेहनत, कठोर शारीरिक परिश्रम, जिद्द, चिकाटीच्या जोरावर भारतीय सैन्यदलात अग्नी विर म्हणून नियुक्ती मिळवली आहे. त्यांच्या या निवडीचे, नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव. सत्यनारायण सोनी,जेष्ठ संचालक. मधुकर निकम, संचालक. सुभाषचंद्र राठी, प्रदिप काबरा, प्रदिप मुळे,संचालक. विष्णूभाऊ सांगुळे, प्रा.दत्ताराव देशमुख, शेषराव मुळे,भगवान डोईफोडे,मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक.भिवसन ससाणे, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख. एस. बी. बोरकर, विष्णू जाधव, रमेश इंगळे, क्रिडविभाग प्रमुख. कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, राजेंद्र जगताप, रविंद्र मोरे, समाधान कांबळे, दिनकर ऊखर्डे, दत्तात्रय ऊखर्डे, प्रा. सुनील बनसोडे, डॉ. अरूण आहेर, प्रा. रामदास भांगे, प्रा. कैलास जाधव, प्रा.जी.टी.धोटे, डॉ. आनंद जाधव, वासुदेव क्षिरसागर, उज्वला आवटी, मंजुषा भिलावेकर,माधुरी पाटील, एफ. ए. शेख, ज्योतीताई जाधव, विजया शिल्लार,कार्यालयीन प्रमुख. सुनिल सकुंडे, प्रयोगशाळा सहाय्यक. राजुभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, दिपक देशमुख, विनोद देशमुख आदींनी, अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

# जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे होते -आ.खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवसेना उपनेते मा. आ.अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपर्क कार्यालय भाग्यनगर जालना येथे स्व गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आमदार अर्जुनरावजी खोतकर यांनी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. आपल्या कार्यकर्तृत्वाने आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या मुंडे साहेबांच्या कार्याचे यावेळी गौरवपूर्वक स्मरण करण्यात आले.व त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. या प्रसंगी बदनापूर चे आमदार नारायण कुचे, भाजपा विधान परिषद उमेदवार सुहास शिरसाठ, संपर्क प्रमुख भास्कर अंबेकर,संपर्क प्रमुख पंडितदादा भुतेकर, मनपा विरोधी पक्षनेते कमलेशजी खरे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुधाकर वाडेकर, माजी पंचायत समिती सभापती प्रेमसिंग राठोड, शिवाजी शेळके, घनश्याम खाकीवाले, सरपंच संदीप घारे, काशिनाथ जाधव, संतोष खरात यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सामाजिक, राजकीय व जनहिताच्या कार्याला उपस्थितांनी उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# जनसामान्यांचा आवाज बुलंद करणारे नेतृत्व म्हणजे स्व.मुंडे साहेब-भास्कर आबा दानवे



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना महानगर भाजपाच्या वतीने स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष, सुनील खरे, संजय डोंगरे, नगरसेवक अर्जुन गेही, शशिकांत घुगे, विष्णू डोंगरे, राजेश जोशी, अनिरुद्ध पांजगे, नगरसेवक कल्याण भदनेकर, जिवन सले, अजित मानधनी, गौरव गोधेकर आदींची उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी सामान्य कार्यकर्त्याला पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याची त्यांची तळमळ आणि जनसामान्यांशी असलेली नाळ ही आजही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार आणि कार्यपद्धती आत्मसात करून समाजसेवा करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा. मुंडे साहेबांनी राज्यातील आणि देशातील राजकारणात सामान्य माणसाचा आवाज बुलंद केला. त्यांच्या संघर्षमय जीवनातून कार्यकर्त्यांनी संघटन बांधणी, जनसंपर्क आणि समाजकारणाचे धडे घ्यावेत असे हि त्यांनी सांगितले.

# जाफराबाद-चिखली रोडवरील जळीत प्रकरणातील फरार आरोपी सुरतमधून अटकेत

## पोलिसांची कारवाई; १५ ते १६ तासांचा प्रवास करून पाण्याच्या टाकीखालून आरोपींना ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद-चिखली रोडवरील कार जळीत प्रकरणाचा तपास वेगाने पुढे सरकत असताना या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी नितीन गवळी व त्याची प्रेयसी अनिता पंडित यांना गुजरात राज्यातील सुरत येथून अटक करण्यात जाफराबाद पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या अटकेमुळे संपूर्ण प्रकरणातील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
या कारवाईसाठी जालना जिल्हा पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर आणि पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक रवाना



करण्यात आले होते.
पोलिस उपनिरीक्षक वाल्मीक नेमाने, जमादार राजेंद्र सानप, पोलीस कॉन्स्टेबल विजय जाधव आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल स्वाती पंडित यांच्या पथकाने अत्यंत शिताफीने सुरत येथे शोधमोहीम राबवली. तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात आला. अखेर एका ठिकाणी पाण्याच्या टाकीखाली लपून बसलेल्या नितीन गवळी व अनिता पंडित यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस पथकाने रातोरात गुजरातकडे रवाना होत सुमारे १५ ते १६ तासांचा प्रवास केला. अथक प्रयत्न, तांत्रिक तपास आणि सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर मुख्य आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकले. दरम्यान, या प्रकरणात आता एकूण चार आरोपींचा सहभाग समोर आला आहे. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, विजय चौहान यांना रंगकाम (कलर) करण्याच्या बहाण्याने बोलावण्यात आले होते. मात्र त्यांनाच या कटाचे लक्ष्य बनविण्यात आले आणि त्यांचा नाहक बळी गेला. आर्थिक फायद्यासाठी व स्वतःचा मृत्यू झाल्याचा बनाव करण्यासाठी हा संपूर्ण कट रचल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. यापूर्वी या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. आता मुख्य आरोपी नितीन गवळी आणि त्याची प्रेयसी अनिता पंडित यांनाही अटक झाल्याने तपासाला नवे वळण मिळाले आहे. या दोघांकडून चौकशीदरम्यान आणखी कोणाचा सहभाग होता का, कट नेमका कसा रचण्यात आला, तसेच पुरावे नष्ट करण्यासाठी कोणकोणत्या हालचाली करण्यात आल्या याबाबत महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे. जाफराबाद-चिखली रोडवरील कार जळीत प्रकरण सुरुवातीला अपघात म्हणून समोर आले होते. मात्र पोलिसांच्या तपासातून हा पूर्वनियोजित कट असल्याचे उघड झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मुख्य आरोपींच्या अटकेनंतर या प्रकरणातील आणखी धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता असून नागरिकांचे लक्ष आता पोलिस तपासाकडे लागले आहे.
या प्रकरणाचा पुढील तपास जाफराबाद पोलिसांकडून सुरू असून आरोपींकडून सखोल चौकशी केली जात आहे.

## अग्रलेख...

# मानवी जीव आणि हप्तेखोरी

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीला लागून असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडीत आणि पुण्यातील हडपसर येथे बनावट दारू पिऊन २२ जणांचा मृत्यू झाला. अशा घटना घडल्यानंतर काही तास हळहळ व्यक्त होते, काही दिवस चर्चा होतात, थोडे फार राजकीय आरोप-प्रत्यारोप होतात, काही अधिकारी निलंबित केले जातात, काही ठिकाणी छापे पडतात आणि पुन्हा सारे सुरळीत होते. याचे प्रमुख कारण म्हणजे आपली निगरगट्ट आणि असंवेदनशील व्यवस्था. गैरकृत्ये टाळण्यासाठी प्रयत्नच केले जात नाहीत. गल्लीबोळातल्या पोरांना माहिती असलेले अड्डे पोलिसांना कसे दिसत नाहीत? किरकोळ हप्त्याच्या लालसेने राज्यात हजारो जीवांशी खेळ करणाऱ्या पोलिस यंत्रणेला आपण जबाबदार धरणार आहोत की नाही, हा खरा प्रश्न आहे. एखाद्या गावात नवीन चहाची टपरी सुरू झाली तरी दोन दिवसांत सर्वांना माहिती होते. मग अवैध दारूचा व्यवसाय, ज्यात माल येतो, साठवला जातो, विकला जातो, ग्राहकांची रांग लागते, तो नेमका पोलिसांच्या नजरेतून कसा सुटतो, असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. आणि पोलिसांची नजर त्यावर जातच नसेल तर त्यांची नजर असते कुठे, हेही विचारण्याचा हा प्रसंग आहे. हा प्रश्न आता उद्ध्वस्त झालेल्या २२ कुटुंबांचा आणि याच समस्येमुळे देशोधडीला लागत असलेल्या हजारो कुटुंबांचा आहे. राज्यात आतापर्यंत बनावट दारूमुळे अशा हजारो हत्या करण्यात आल्या आहेत. या हत्येचे गुन्हेगार केवळ बनावट दारू तयार करणारे नाहीत. त्यांना वाढू देणारी, फोफावू देणारी आणि त्यांच्या अवैध साम्राज्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करणारी व्यवस्थाही गुन्हेगार आहे. आज राज्यात हजारो ठिकाणी अवैध दारू, मटका, जुगार, अमली पदार्थ आणि इतर बेकायदेशीर व्यवसाय सुरू आहेत. पोलिसांच्या माहितीशिवाय कोणताही 'अड्डा' चालू शकत नाही, हा अलिखित नियम. पण, डोळेझाक ठरलेली असते. अशा घटना त्या अर्थपूर्ण डोळेझाकीतून घडतात. अशा अड्ड्यांवर घातक रसायने आणली जातात, बनावट कारखाने उभे राहतात, वितरण व्यवस्था तयार होते. या साखळीतल्या प्रत्येक टप्प्यावर शासकीय यंत्रणेला हस्तक्षेप करण्याची संधी असते. पण तो होत नाही. याचे एकमेव कारण म्हणजे हप्तेखोरी. मग ज्यांनी कायद्याचे रक्षण करायचे, तेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांचे संरक्षण करू लागतात. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात आजही बनावट दारूचे साम्राज्य टिकून आहे, ही लाजिरवाणी बाब आहे.

तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. सीसीटीव्ही यंत्रणा आहे. मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आहे. आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणा आहेत. तरीही अवैध दारूचे अड्डे उघडपणे चालत असतील, तर समस्या तंत्रज्ञानाची नाही; समस्या इच्छाशक्तीची आहे. प्रश्न केवळ पोलिसांचाच नाही. राज्य उत्पादन शुल्क विभागाची जबाबदारी काय? स्थानिक प्रशासनाची जबाबदारी काय? लोकप्रतिनिधींची जबाबदारी काय? अनेकदा नागरिक तक्रारी करतात, निवेदने देतात, आंदोलन करतात. पण कारवाई होत नाही. तक्रार करणाऱ्यांनाच अडचणींना तोंड द्यावे लागते. कारण अवैध धंद्यांच्या साखळीत अनेक हितसंबंध गुंतलेले असतात. बनावट दारूमुळे मरण पावलेले लोक प्रामुख्याने गरीब असतात. त्यात कष्टकरी मजूर असतात. त्यांच्या मृत्यूबद्दल समाजाचा दृष्टिकोनही संवेदनशील राहत नाही. हे थांबायचे असेल तर सर्वांना सदैव जागे राहावे लागेल. दुर्घटना घडल्यानंतर जागे होणाऱ्या यंत्रणेला आता दुर्घटना होण्यापूर्वी जागे व्हावे लागेल. असे अड्डे उद्ध्वस्त करणे, दोषींना अटक करणे आणि निलंबनाची औपचारिकता पूर्ण करणे पुरेसे नाही. अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या संपूर्ण साखळीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी लागेल. केवळ खालच्या पातळीवरील कर्मचाऱ्यांवर जबाबदारी ढकलून चालणार नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही उत्तरदायी ठरवावे लागेल. कायद्याचे रक्षकच गुन्हेगारांचे संरक्षक बनले आहेत असे लोकांना वाटू लागते तेव्हा व्यवस्थेवरील विश्वास ढासळू लागतो. हा विश्वास परत मिळवण्यासाठी ठोस कृती आवश्यक आहे.

फुगेवाडी आणि हडपसरमधील मृत्यू हा राज्यासाठी इशारा आहे. हा इशारा दुर्लक्षित केला, तर उद्या अशाच प्रकारे आणखी शेकडो-हजारो कुटुंबे उद्ध्वस्त होतील. हे दुष्टचक्र थांबवायचे असेल, तर आता प्रश्न थेट विचारावा लागेल. कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत बनावट दारूमुळे होणारा प्रत्येक मृत्यू हा केवळ गुन्हेगारांचा नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेचा अपराध मानावा लागेल. बनावट दारूचा सर्वाधिक फटका समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाला, म्हणजेच कष्टकरी, मजूर आणि रोजंदारीवर जगणाऱ्या वर्गाला बसतो. अवघ्या २० ते ३० रुपयांच्या प्लास्टिक पिशव्यांमधून मिळणारी ही दारू म्हणजे प्रत्यक्ष यमदूतच असते. या विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडणारे बहुतांश लोक हे कुटुंबातील एकमेव कमावते पुरुष असतात. एका रात्रीत त्यांचा मृत्यू झाल्याने अख्खे कुटुंब उघड्यावर पडते. या दारूत नशा वाढवण्यासाठी बेकायदेशीरपणे मिसळले जाणारे मिथेनॉल अत्यंत घातक रसायन शरीरात जाऊन फॉर्मिक ॲसिड तयार करते. जीव वाचला तरी मेंदूवर कायमचा परिणाम होतो किंवा दृष्टी जाते. कुटुंबाचा आधार असणारा माणूस जेव्हा कायमचा परावलंबी होतो, तेव्हा त्या कुटुंबाची परवड सुरू होते. कायदेशीर आणि मान्यताप्राप्त दारू विक्रीवर राज्य शासनाला मोठ्या प्रमाणात राज्य उत्पादन शुल्क कर मिळतो. तो राज्याच्या विकासासाठी वापरला जातो. बनावट दारूच्या समांतर बाजारपेठेमुळे शासनाचा हा महसूल थेट माफियांच्या खिशात जातो. गोव्यासारख्या शेजारील राज्यातून हलक्या दर्जाची दारू आणून, तिच्यावर नामांकित कंपन्यांचे बनावट लेबल लावून ती महाराष्ट्रात विकली जाते. हा कोट्यवधी रुपयांचा काळा पैसा करमुक्त असल्याने सरकारचा महसूल तर बुडतोच, शिवाय हाच पैसा नव्याने इतर बेकायदेशीर धंद्यांकडे वळवला जातो. बनावट दारूचे अड्डे पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाच्या डोळ्यांदेखत किंवा त्यांच्या दुर्लक्षामुळे चालतात, हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. नुकत्याच पुण्यात झालेल्या घटनेनंतर अनेक पोलिस आणि एक्साईज अधिकाऱ्यांचे झालेले निलंबन हेच दर्शवते. कायद्याचा धाक संपल्यामुळे गुन्हेगारी टोळ्यांची पाळेमुळे घट्ट होतात. त्याच टोळ्या कायद्याला आव्हान देतात. बनावट दारूसाठी वापरल्या जाणाऱ्या औद्योगिक वापराच्या मिथेनॉलच्या किंवा तत्सम रसायनांच्या प्रत्येक थेंबाचा-कणांचा हिशेब ऑनलाईन ट्रॅक झाला पाहिजे. बनावट दारू तयार करणाऱ्या आणि विकणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे.

महाराष्ट्र हे संतांचे, समाजसुधारकांचे आणि पुरोगामी विचारांचे राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्याच्या सामाजिक आणि नैतिक पायाभूत मूल्यांमध्ये माणसाच्या जीवाला सर्वोच्च स्थान आहे. हप्त्यांसाठी गरिबांच्या जीवाशी खेळणारे अड्डे उघडपणे चालू दिले जातात तेव्हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा राहत नाही; तो राज्याच्या नैतिक अध:पतनाचा बनतो. बनावट दारूमुळे होणारा प्रत्येक मृत्यू हा एकेका कुटुंबाच्या स्वप्नांचा, आशांचा आणि भविष्याचाही अंत असतो. त्यामुळे या घटनेकडे केवळ गुन्हेगारी किंवा महसुली नुकसान म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. आज गरज आहे ती अशा गुन्ह्यांना खतपाणी घालणाऱ्या संपूर्ण साखळीचा बीमोड करण्याची. कायद्याचा धाक, प्रशासनाची पारदर्शकता आणि समाजाची जागरूकता या तीन गोष्टी एकत्र आल्याशिवाय ही लढाई जिंकता येणार नाही. अन्यथा प्रत्येक दुर्घटनेनंतर शोक व्यक्त करणे, चौकशीचे आदेश देणे आणि काही दिवसांनी सर्व काही विसरून जाणे अशीच परिपाठी सुरू राहील. शेवटी मानवाचा जीव सर्वांत महत्त्वाचा आहे. सारे कायदे आणि सारी व्यवस्था त्यासाठीच तयार केली गेली आहे. त्यासाठीच या व्यवस्थेला कराच्या पैशातून पोसले जाते. त्यासाठीच या व्यवस्थेतील बाशिंद्यांना पगार दिले जातात. परंतु, त्यांची भूक पगारावर भागत नाही. त्यामुळे हप्तेखोरीत त्यांना काही गैर वाटत नाही. सरकारला तरी हे सारे गैर वाटले पाहिजे आणि मानवी जीवनाचे मूल्य हप्त्यांहून मोठे आहे, हे मान्य करून हप्तेखोरीवर पूर्णपणे आळा घालण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजेत.


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआय आणि सायबर गुन्हेगारी

आजचे जग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. बँकिंग, शिक्षण, आरोग्य, व्यापार, शासन, संवाद, मनोरंजन, वाहतूक अशा प्रत्येक क्षेत्रात संगणक आणि इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला असून समाजमाध्यमे लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र शिक्षण, क्लाऊड संगणन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, मोठ्या प्रमाणातील माहिती विश्लेषण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवाचे जीवन अधिक वेगवान आणि सोयीस्कर झाले आहे. परंतु ज्या तंत्रज्ञानामुळे विकास साधला जात आहे, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर गुन्हेगार अत्यंत धोकादायक आणि चलाख पद्धतीने गुन्हे करीत आहेत. सायबर गुन्हेगारी म्हणजे संगणक, इंटरनेट, मोबाईल, डिजिटल नेटवर्क किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करून केलेले गैरकृत्य. यामध्ये माहिती चोरी, आर्थिक फसवणूक, हॅकिंग, बनावट संकेतस्थळे, फिशिंग, मालवेअर, रॅन्समवेअर, समाजमाध्यमांवरील छळ, ओळख चोरी, डीपफेक, अश्लील सामग्री प्रसारित करणे, डिजिटल ब्लॅकमेलिंग, सायबर स्टॉकिंग अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो. आज या सर्व प्रकारांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता एआय म्हणजे संगणकाला मानवी विचारसरणीप्रमाणे शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. हे तंत्रज्ञान उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, शेती, शिक्षण, संशोधन यासाठी अत्यंत उपयुक्त आहे; परंतु सायबर गुन्हेगारांनी त्याचा दुरुपयोग सुरू केला आहे. आज फिशिंग म्हणजेच सावज हेरण्यासाठी केले जाणारे हल्ले अधिक धोकादायक झाले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केलेल्या ई-मेल अत्यंत विश्वासार्ह वाटतात. या मेल संबंधित व्यक्तीच्या नावाने, कार्यालयाच्या शैलीत किंवा बँकेच्या अधिकृत भाषेत लिहिलेल्या असतात.

भारतामध्ये अनेक नागरिकांना 'तुमचे बँक खाते बंद होणार आहे', 'केवायसी अपडेट करा', 'तुम्ही लॉटरी जिंकली आहे' किंवा 'तुमच्या खात्यातून पैसे कापले गेले' अशा संदेशांद्वारे फसवले जाते. काही प्रकरणांमध्ये बनावट ग्राहक सेवा क्रमांक तयार करून लोकांकडून दूरध्वनीद्वारे गुप्त माहिती मिळविली जाते. अलिकडील काळात भारतातील अनेक शहरांमध्ये 'डिजिटल अरेस्ट'चे प्रकार समोर आले. पोलिस, अंमलबजावणी अधिकारी किंवा न्यायालयीन अधिकारी असल्याचे भासवून गुन्हेगार नागरिकांना घाबरवतात आणि ऑनलाईन पैसे उकळतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार होणारे 'डीपफेक' हे आधुनिक काळातील सर्वात मोठे संकट मानले जात आहे. डीपफेक तंत्रज्ञानाद्वारे एखाद्या व्यक्तीचा चेहरा, आवाज किंवा हालचाली हुबेहूब नक्कल करून बनावट व्हिडीओ किंवा ध्वनिफीत तयार करता येते. काही महिन्यांपूर्वी भारतातील अनेक प्रसिद्ध कलाकार आणि उद्योजक यांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्हिडीओ प्रसारित झाले होते. काही गुन्हेगारांनी उद्योगपतींच्या आवाजाची नक्कल करून कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे आदेश दिले. परदेशात एका कंपनीच्या अधिकाऱ्याला त्याच्या वरिष्ठांचा बनावट आवाज ऐकवून लाखो डॉलर्सची फसवणूक करण्यात आली होती. अशा घटना भारतातही वाढू लागल्या आहेत.



महिलांविरोधातील सायबर गुन्ह्यांमध्येही डीपफेक आणि मॉर्फिंगचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. समाजमाध्यमांवरील फोटो वापरून बनावट अश्लील चित्रफिती तयार केल्या जातात आणि त्याद्वारे ब्लॅकमेल केले जाते. विद्यार्थिनी, व्यावसायिक महिला, कलाकार आणि सार्वजनिक जीवनातील व्यक्ती या विशेषतः या प्रकाराला बळी पडतात. अशा प्रकारांमुळे मानसिक ताण, सामाजिक अपमान आणि आत्महत्येसारख्या घटना घडण्याचा धोका वाढतो. रॅन्समवेअर हा आणखी एक गंभीर सायबर हल्ला आहे. यामध्ये संगणकातील माहिती हडप केली जाते आणि ती पुन्हा मिळवण्यासाठी खंडणी मागितली जाते. रुग्णालये, बँका, उद्योग, सरकारी कार्यालये यांच्यावर अशा हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. भारतातील काही मोठ्या रुग्णालयांच्या संगणक प्रणालींवर हल्ले झाल्याने रुग्णसेवा विस्कळीत झाली होती. काही वर्षांपूर्वी देशातील एका प्रमुख वैद्यकीय संस्थेची माहिती प्रणाली ठप्प होऊन हजारो रुग्णांची माहिती धोक्यात आली होती. अशा घटनांमुळे राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे पासवर्ड फोडण्याची प्रक्रिया शक्य आणि वेगवान झाली आहे. अनेक लोक जन्मतारीख, मोबाईल क्रमांक किंवा साधे शब्द पासवर्ड म्हणून वापरतात. कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये लाखो संभाव्य संयोजनांचा अभ्यास करून योग्य पासवर्ड शोधू शकते. त्यामुळे दुबळे पासवर्ड वापरणारे खाते सहज हॅक होते.

समाजमाध्यमे ही सायबर गुन्हेगारांसाठी मोठी शस्त्रे बनली आहेत. गुन्हेगार या माहितीचा वापर करून भावनिक किंवा आर्थिक फसवणूक करतात. काही जण खोट्या प्रोफाईलद्वारे मैत्री करतात, विश्वास संपादन करतात आणि नंतर पैशांची मागणी करतात. 'ऑनलाईन प्रेमसंबंध' आणि 'गुंतवणूक सल्ला' या नावाखाली मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. क्रिप्टोकरन्सी आणि ऑनलाईन गुंतवणूक योजनांमुळेही नवीन प्रकारची सायबर गुन्हेगारी वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने बनावट गुंतवणूक संकेतस्थळे, बनावट नफा दाखवणारे आकडे आणि खोटे ग्राहक अभिप्राय तयार केले जातात. लोकांना अल्पावधीत मोठा नफा मिळेल असे सांगून पैसे गुंतवायला भाग पाडले जाते. एकदा पैसे जमा झाले की संकेतस्थळ गायब होते. इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे घरातील अनेक उपकरणे इंटरनेटशी जोडली गेली आहेत. स्मार्ट दूरचित्रवाणी, सुरक्षा कॅमेरे, स्मार्ट कुलपे, रेफ्रिजरेटर, आवाजावर चालणारी उपकरणे यांमध्ये पुरेशी सुरक्षा नसल्यास गैरवापर होऊ शकतो. गुन्हेगार या उपकरणांमध्ये प्रवेश मिळवून घरातील हालचालींची माहिती मिळवून मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ले करण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून दिशाभूल करणारी माहितीही मोठ्या प्रमाणावर पसरवली जाते. निवडणुका, धार्मिक प्रश्न किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील मुद्यांवर बनावट संदेश आणि व्हिडीओ प्रसारित करुन समाजात भीती, द्वेष आणि अस्थिरता निर्माण केली जाऊ शकते.

सायबर गुन्ह्यांविरोधात कायदे असले तरी तंत्रज्ञानाचा वेग खूप मोठा आहे. गुन्हेगार अनेकदा परदेशातून काम करतात. तेव्हा ओळख लपवण्यासाठी व्हर्च्युअल नेटवर्क, बनावट उपकरणे आणि गुप्त तंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे राहते. या परिस्थितीत केवळ सरकार किंवा पोलिस यंत्रणा पुरेशा नाहीत. प्रत्येक नागरिकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी दुव्यावर क्लिक करू नये, बँक माहिती किंवा संकेतशब्द कोणालाही सांगू नयेत, समाजमाध्यमांवर अतिवैयक्तिक माहिती शेअर करू नये, मजबूत संकेतशब्द वापरावेत. शैक्षणिक संस्था, उद्योग आणि शासन यांनीही आधुनिक सुरक्षाप्रणाली वापरणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुरक्षा साधने, माहिती सांकेतिकीकरण, नियमित बॅकअप, सुरक्षा तपासणी आणि कर्मचारी प्रशिक्षण यामुळे धोका कमी करता येतो. भारत सरकारने राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण, सायबर गुन्हे तक्रार पोर्टल आणि डिजिटल सुरक्षा मोहिमा सुरू केल्या आहेत. तरीही सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कायम सतर्कता ठेवावी लागणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवजातीसाठी अत्यंत शक्तिशाली आणि उपयुक्त निर्मिती आहे.

परंतु या तंत्रज्ञानाचा विकास ज्या वेगाने होत आहे, त्याच वेगाने सायबर गुन्हेगारही चलाख आणि धोकादायक होत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, डिजिटल साक्षरता, मजबूत कायदे आणि जागतिक सहकार्य ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. सायबर सुरक्षितता ही आता केवळ तांत्रिक बाब राहिलेली नाही; तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी, प्रतिष्ठेशी आणि देशाच्या सुरक्षेशी जोडलेली आहे. म्हणूनच तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर करणे आवश्यक आहे.


(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# एक व्यक्ती एक झाड आता अत्यावश्यक

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. अलिकडच्या काही वर्षांमध्ये सरासरी तापमानात ०.५ ते १ अंश सेल्सियसपर्यंत दरवर्षी वाढ आहे. त्याचे विपरीत परिणाम सजीवांवर पाहायला मिळत आहेत. तापमान वाढीच्या काही प्रमुख कारणांपैकी विकासाच्या नावावर कमी होणारे ग्रीन झोन हे एक कारण आहे. विकासाचा कोणताही प्रकल्प हाती घेतला तर झाडांची कत्तल मोठ्या प्रमाणात होते. नियमानुसार जेवढी झाडे कापली, तेवढी लावणे बंधनकारक आहे. ती लावली पण जातात. पुढे त्या झाडांचे शंभर टक्के संगोपन होत नाही, हे वास्तव आहे. विविध शहरांमध्ये होणारे रस्ते म्हणा किंवा शहराच्या बाहेरून जाणारे बायपास मार्ग, महामार्ग आणि प्रकल्प तयार करताना जुनी झाडे तोडली जातात. देशभरात अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यातील एक उदाहरण अमरावती-परतवाडा मार्गावरचे आहे. चिखलदऱ्याला जाण्यासाठी या मार्गावर इंग्रजांनी शंभर वर्षांपूर्वी लावलेली कुडूनिंबाची शेकडो झाडे रस्ता रुंदीकरणासाठी आता तोडण्यात येत आहेत. वाढत्या वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी नवे रस्तेही तेवढेच आवश्यक आहेत. रस्ते तयार झाल्यावर दोन्ही बाजूने नवी झाडे लावली जातात.



पण, त्यातील किती जिवंत राहतात हा प्रश्नच असून जी झाडे जगतात त्यांच्याकडून अपेक्षित परिणाम मिळायला वेळ लागतो. परिणामस्वरूप त्या भागातल्या वातावरणावर विपरीत परिणाम दिसायला लागतो.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या उन्हाळ्याची तीव्रता जास्त होती. विदर्भातले बहुतांश जिल्हे होरपळले. राज्यातल्या अन्य जिल्ह्यांमध्येही तापमान वाढले. बाहेर फिरताना होणारी अंगाची लाहीलाही झाडांचे महत्त्व विशद करणारी होती. गत काही वर्षांपासून दरवर्षी पावसाळा आला की, झाडांबद्दचे प्रेम ओसंडून वाहते. दोन झाडे लावायची आणि हातभर प्रसिद्धी करायची, हा अनेकांचा धंदा झाला आहे. काळजीपूर्वक झाडे लावून ती जगविणारे मोजकेच आहेत. शासकीय यंत्रणा नेहमीप्रमाणे गाजावाजा करते. वेगवेगळे अभियान व योजना राबविते. त्याचे अपेक्षित परिणाम अजूनही मिळालेले नाहीत. पंतप्रधान, मुख्यमंत्री व पर्यावरण विभागाने आवाहन केले की, फोटो काढण्यापुरती झाडे लावली जातात. मागे किती तरी कोटी वृक्ष लावण्यात आली, त्यातील किती जगली याचा हिशेब कोणाकडेच नाही. त्यातील पंचवीस टक्के झाडे दिसली असती तर चित्र वेगळे असते. निसर्गाचे शोषण करण्याच्या नादात माणूस स्वत:वरच संकट ओढवून घेत आहे. झाडांची संख्या कमी होत असल्याने निसर्गचक्र बाधित झाले आहे. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे तिन्ही ऋतू आपले मूळ चरित्र विसरत आहेत. ते प्रमाण जर वाढले तर स्थिती भंयकर होईल. शहरे आणि गावांमध्ये ग्रीन झोन वाढविण्यासाठी ठोस उपायोजना अजिबात होताना दिसत नाहीत. उंच ठिकाणावरून कोणत्याही शहरावर नजर टाकली की काँक्रीटचे जंगलच दृष्टीस पडते. तसेच या शहराच्या आजूबाजूचा परिसर भकास असतो. अगदी बोटावर मोजता येईल इतकीच शहरे वृक्षवल्लीने समृद्ध आहेत. विकास व्हायलाच हवा, तो काळाची गरज आहे पण, तो समतोल नसला की अडचणी निर्माण होतात. वेगाने वाढणाऱ्या तापमानाच्या स्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शाश्वत उपायोजनांची नितांत गरज आहे. झाडे लावण्यासाठी आतापर्यंत वेगवेगळी अभियाने राबविण्यात आलीत, पण त्याच्या मर्यादा समोर आल्या. आता एक व्यक्ती एक झाड लावण्याशिवाय पर्याय नाही. हे अभियान कायद्यात व नियमांमध्ये तरतुदी आणि व्यापक जनजागृती करून हाती घ्यावे लागणार आहे. रस्ते व मोठे प्रकल्प तयार करणाऱ्या कंत्राटदार कंपनीला झाडे लावणे व ती स्वावलंबी होईपर्यंत संगोपन करणे हे त्यांच्या मूळ कामात नोंदवावे लागेल आणि ते प्रामाणिकपणे त्यांच्याकडून करून घ्यावे लागेल. झाडे लावणाऱ्यांना वेगवेगळ्या सवलती देण्यासंदर्भातली योजना सुरू करता येते का, यावर विचार व्हायला हवा. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आपल्या अधीनस्त महाविद्यालयांतील विद्यार्थांच्या माध्यमातून एक विद्यार्थी एक वृक्ष हे अभियान राबविण्याचा विचार करीत आहे. याच प्रकारे अन्य विद्यापीठे, मोठ्या शैक्षणिक संस्था, देवस्थाने व मोठ्या कंपन्यांनी झाडे लावण्याची वेगवेगळी अभियाने राबविली तर मोठा हातभार लागू शकतो. अशी अभियाने राबविण्यासाठी शासनाने त्यांना प्रोत्साहित करायला हवे. जे उल्लेखनीय कार्य करतील त्यांना वेगवेगळ्या स्वरूपाची बक्षिसे, प्रमाणपत्रे, गुणाकंन द्यावे. त्याचे काय फायदे होतील तेही सांगावे. जे अभियान राबविणार नाहीत, त्यांना होणाऱ्या हानीची जाणीवही करून द्यावी. झाडे तोडणाऱ्यांना माफी नसावी. तेव्हाच वातावरणाचा ताल जागेवर येईल.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# सप्त स्वर

**'संगीत है शक्ती ईश्वर की, हर स्वर मे बसे है राम।**
**रागी जो सुनाये रागिनी, रोगी को मिले आराम।'**

संगीताला ईश्वराची शक्ती म्हटले आहे. नारद, तुंबरू, गंधर्व यांची नावे गायन कलेसाठी घेतली जातात. सरस्वती माता तर हातात वीणा घेऊनच आहे. रामायणात रावण आणि लवकुश यांचे संगीत प्रसिद्ध आहे. भगवान शिवाचे तांडव सर्वांना ज्ञात आहे. नटराज तर कलाप्रेमींचे दैवत आहे. सामवेद गायन आपण ऐकून आहोत. वेदाचा एक उपवेद गांधर्ववेद स्वराशीच संबंधित आहे. भगवान श्रीकृष्णाची बासरी चराचराला भावविभोर करीत असे. अर्जुनाला अज्ञातवासात बृहन्नडा बनून राहताना संगीताचा आधार मिळाला.


वैज्ञानिक विचार केला तर स्वर निर्मिती कंपनामुळे होते. स्वर स्वर्गीय सुखाचा आनंद देतात. अध्यात्मात संगीत साधनेला महत्त्व आहे. 'धन्य ते गायनी कला' असे समर्थांनी म्हटले आहे. दत्त संप्रदायात तर गायनाला प्राधान्य आहे. स्वत: भगवंत नारदांना स्पष्ट सांगतात...

**'नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये न च।**
**मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद॥'**

स्वरांचे महत्त्व यावरून लक्षात येईल. भारतीय संगीतात सप्त स्वर सांगितले आहेत- सा रे ग म प ध नी. यांना अनुक्रमे षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद म्हणतात. या स्वरांची निर्मिती प्रथम ब्रह्मदेवाने केली आणि त्यानंतर देवर्षी नारदांनी तिचा प्रसार केल्याचे पौराणिक मत आहे.

**'उदात्ते निषादगांधारौ, अनुदात्त ऋषभधैवतौ।**
**स्वरितप्रभवा ह्येते, षड्जमध्यमपञ्चमः॥'**

वैदिक काळात स्वरांची तीन प्रकारात रचना होती. देवर्षी नारदांनी नारदीय शिक्षा ग्रंथात प्रथम किंवा उदात्त स्वर म्हणून गंधार आणि निषाद, द्वितीय किंवा अनुदात्त म्हणून ऋषभ आणि धैवत तर तृतीय किंवा स्वरीत म्हणून षड्ज, मध्यम आणि पंचम सांगितले. या स्वरांची निर्मिती काही प्राणी आणि पक्ष्यांच्या आवाजातील साधर्म्यावरून शोधल्या गेली.



**'मयूर चटकाछाग क्रौञ्च कोकिल दुर्दुरा।**
**गजश्च सप्त षड्जादौंकृमा दुच्चार्यान्त्यमी॥'**

सा म्हणजे षड्ज हा स्वर मोराच्या, रे म्हणजे ऋषभ हा स्वर गाईच्या हंबरण्यावरून, ग म्हणजे गंधार हा अज म्हणजे बकरीच्या आवाजावरून, म म्हणजे मध्यम हा स्वर क्रौंच पक्ष्याच्या, प म्हणजे पंचम हा स्वर कोकीळ पक्ष्याच्या आवाजावरून, ध म्हणजे धैवत हा स्वर घोड्यांच्या खिंकाळण्यावरून तर नि म्हणजे निषाद हा हत्तीच्या चित्कारावरून घेतल्याचे संगीत शास्त्रात काही ठिकाणी दिले आहे. या सप्त स्वरावरच संगीत आधारित आहे. सप्त स्वराचे थोडक्यात वर्णन पाहू-

१) **सा-षड्ज** : हा सप्त स्वरातील पहिलाच स्वर असून षड्ज इतर सहा स्वरांचा जनक आहे म्हणून षड्ज. सहा जणांपासून जन्मला म्हणून षड्ज. हा स्वर मनाला आनंद देतो. षड्ज म्हणजे शांत, षड्ज म्हणजे समाधान. षड्ज ध्यान, समाधीची कवाडे उघडतो. षड्ज मोराच्या आवाजाशी साधर्म्य ठेवतो.

२) **ऋषभ** : सप्त स्वरातील दुसरा रे म्हणजे ऋषभ. नावावरूनच त्यांचा संबंध बैलाच्या किंवा गोवंशाच्या आवाजाशी म्हणजे हंबरण्याशी साधर्म्य ठेवणारा तसेच तो बैलासारखा तेज आहे म्हणून ऋषभ.

३) **ग-गंधार** : हा स्वर मधुर आणि भावनांनी परिपूर्ण असल्याने गंधार. अज म्हणजे बकरीच्या आवाजाशी साधर्म्य ठेवणारा हा स्वर आहे.

४) **म-मध्यम** : सर्व सर्वांच्या मध्यभागी असल्यामुळे याला मध्यम म्हणतात. क्रौंच पक्ष्याच्या आवाजाशी साधर्म्य असलेला हा स्वर आहे.

५) **प-पंचम** : सप्त स्वरातील पाचवा स्वर असल्यामुळे याला पंचम म्हणतात. कोकिळेच्या कुहू काराशी साधर्म्य असलेला हा स्वर आहे.

६) **ध-धैवत** : वैराग्य आणि शांतता दर्शक असल्याने धैवत. हा स्वर घोड्याच्या खिंकाळण्याशी साधर्म्य ठेवतो.

७) **नि-निषाद** : सप्त स्वराशील अंतिम असलेला स्वर हत्तीच्या चित्काराशी साधर्म्य असलेला स्वर आहे.


सप्त स्वरांचा चढता क्रम आरोह तर उतरता क्रम अवरोह असतो. स्वर साधना ही नादब्रह्माची उपासना आहे. म्हणूनच वेदात संगीताचा उलेख आहे. नारद, याज्ञवल्क्य, भरतमुनी इत्यादींनी याबाबत योगदान दिले आहे. रत्नप्रदीपिका, नारदीय शिक्षा, नाट्यशास्त्र, संगीत चुडामणी, संगीत सुधाकर, संगीत रत्नावली इत्यादी ग्रंथातून भारतीय स्वर आणि संगीताचे वर्णन आहे. प्रत्येक स्वराचा बाज आणि पोत वेगळा असला, तरी ते जेव्हा एकवटतात तेव्हा ध्वनीची अलौकिक ऊर्जा तयार होते. त्यातून निर्माण उर्जेतून दिवे लागण्याचे, पाऊस पाडण्याचे सामर्थ्य निर्माण होते. दीप राग, मल्हार त्याची उदाहरणे आहेत.

उदास मनाला चैतन्य देण्याचे काम सूर करतात. सूर आनंदाश्रू-दु:खाश्रूंना वाट करून देऊ शकतात. नादब्रह्माची ही उपासना परमेष्ठीपर्यंत पोचण्याचे साधन आहे. भारतीय संगीत ही ईश्वराची शक्ती असून प्रत्येक स्वरात श्रीराम वसलेले आहेत. म्हणूनच प्रात:स्मरणात सप्त स्वरांचे स्मरण करण्यात येते.

९८२२२६२७३५

## डेक्कन क्वीन नाबाद ९७

जगातील अशा मोजक्या रेल्वेगाड्यांपैकी डेक्कन क्वीन एक आहे, जिचा वाढदिवस तब्बल ७२ वर्षांपासून सातत्याने साजरा केला जातो. पुणे आणि मुंबई या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारी, लाखो चाकरमान्यांच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग बनलेली डेक्कन क्वीन नुकतीच ९७ वर्षांची झाली. १ जून १९३० रोजी पुणे-मुंबई-पुणे मार्गावर डेक्कन क्वीनची सेवाकार्यासाठी सुरू झाली. त्या काळात आधुनिक सोयी सुविधांसाठी ही गाडी विशेष ओळखली जात होती. कालांतराने ती केवळ एक रेल्वेगाडी न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली. पुणे-मुंबई दरम्यानच्या प्रवासासाठी दररोज हजारो प्रवासी डेक्कन क्वीनला प्राधान्य देतात. प्रवाशांशी निर्माण झालेले भावनिक नाते यामुळे ही गाडी अनेक पिढ्यांची आवडती ठरली आहे. सह्याद्रीच्या निसर्गरम्य घाटातून वाटचाल करणाऱ्या या रेल्वेगाडीबद्दल प्रवाशांच्या मनात आजही तेवढाच आदर आणि आपुलकी आहे. डेक्कन क्वीनचा हा ९७ वा वाढदिवस केवळ एका रेल्वेगाडीचा उत्सव नसून, महाराष्ट्राच्या रेल्वे इतिहासातील एका सुवर्णपानाचा गौरव करणारा क्षण आहे.



**विश्वनाथ पंडित**/ठाणे

## वाचक पत्रे

### विश्वास आणि अविश्वास

शालेय जीवनात उन्हाळ्याची सुट्टी लागली की आवर्जून आनंद, मौजमजा करण्यासाठी मुले गावाला जायची; तीसुद्धा वयानुसार गाडी भाड्याच्या अर्ध्या तिकिटाच्या आकारात. तेव्हा आई असो वा मावशी, आत्या, काकी, मामी त्यांना संपूर्ण आकाराचे तिकीट असायचे; आता मात्र त्या उलट आहे. त्या सर्वांचे अर्धे तिकीट व मुलांचे पूर्ण रकमेचे तिकीट आहे. त्यावेळी आईवर किंवा अन्य मंडळींवर विश्वास असायचा म्हणून मुलांच्या वयाचा पुरावा देण्याची गरज भासली नाही, पण आता मात्र त्या मंडळींचे आधार कार्ड त्यांच्या वयाच्या पुराव्यासाठी दाखवावे लागते कारण मुलांवर कोणाचा विश्वासच उरला नाही. काहीही असो एसटी महामंडळ झिंदाबाद म्हणावेच लागेल .

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### पाणीटंचाईचे संकट आणि अल निनोचे सावट

सध्याची स्थिती पाहता महाराष्ट्रातील जलसाठ्यांची स्थिती चिंताजनक होत चालली आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यातील धरणसाठा केवळ ३० शिल्लक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही घट लक्षणीय असून, त्यातच यावर्षी अल निनो प्रभावामुळे मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. जर पाऊस लांबला किंवा सरासरीपेक्षा कमी झाला, तर राज्याला भीषण दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो. ही केवळ प्रशासनासाठी धोक्याची घंटा नसून, सर्वसामान्य जनतेसाठीही सतर्क राहण्याचा इशारा आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर नियोजन करणे आवश्यक आहे. जसे, उपलब्ध पाणी साठ्याचे तातडीने वॉटर ऑडिट करून ते केवळ पिण्यासाठी आरक्षित करणे गरजेचे आहे. बाष्पीभवन रोखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि अनधिकृत पाणी उपसा थांबवण्यासाठी कडक पावले उचलली पाहिजेत. मान्सूनपूर्व काळात नद्या, नाले आणि तलावांमधील गाळ काढल्यास त्यांची साठवण क्षमता वाढते. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारसारख्या योजना अधिक प्रभावीपणे राबवून जलसाठ्यांची क्षमता वाढवणे हा एक शाश्वत उपाय आहे. टँकरमुक्त गावांसाठी आतापासूनच पर्यायी व्यवस्था शोधणे आणि शहरी भागात पाणी कपातीचे नियोजन करून शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचवणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य आहे. दुष्काळाचा सामना केवळ सरकार करू शकत नाही, त्यासाठी लोकसहभाग अनिवार्य आहे. घराघरांत पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे. रेन वॉटर हार्वेस्टिंग हा केवळ सरकारी नियम नसून ती काळाची गरज आहे. सोसायट्या आणि वैयक्तिक घरांच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत जिरवल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. येणाऱ्या पावसाळ्यातील प्रत्येक थेंब साठवण्याचे नियोजन आताच करायला हवे. शेतीसाठी पाण्याचा सर्वाधिक वापर होतो. अल निनोच्या काळात पारंपरिक पद्धतीने पाणी न देता ठिबक किंवा तुषार सिंचनाचा अवलंब करून शेतकऱ्यांनी कमी पाण्यात जास्त पिके घेण्याचे तंत्र आत्मसात करावे, शासनाने याकरिता प्रोत्साहन योजना जाहीर कराव्यात. अल निनोमुळे पाऊस कमी झाला, तर त्याचा परिणाम अन्नसुरक्षेवरही होणारच आहे. पाणीटंचाईचे संकट दारात उभे आहे. अशा बिकटप्रसंगी वैयक्तिक आणि शासन स्तरावर तत्काळ काय करता येईल, ते करावे.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांची पुण्यतिथी साजरी

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ३ जून : लोकनेते महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांची अहमदपूर येथे पुण्यतिथी साजरी.

अहमदपूर शहरातील नांदेड, लातूर राष्ट्रीय महामार्गावरील गोपीनाथरावजी मुंडे चौकात स्व. गोपीनाथरावजी यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी गोपीनाथरावजी मुंडे यांचा जयघोषाने अहमदपूर शहरासह परिसर दणाणून गेला होता. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, माजी मंत्री विनायकराव पाटील, जिल्हा परिषद सदस्य ॲड. अजिंक्य देशमुख, प्रदीप खोमणे, भाजपाचे गोविंद गिरी, नाथराव केंद्रे,हणमंत देवकते,यशवंत केंद्रे, नगरसेवक ॲड. निखिल कासनाळे, ॲड. अजिक्य चामे, ज्ञानोबा बडगिरे, सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, रामानंद मुंडे, रमेश कांबळे, शरद मुंडे, अनंत गुट्टे, व्यंकट इप्पर,गोपीनाथ जायभाऐ,गणेश मुंडे, संतोष कोटलवार,आनंत देवकते, अर्जून गंगथडे,संभाजी केंद्रे,हरीराम गुट्टे, नागनाथ इप्पर, यांच्या सह गोपीनाथरावजी मुंडे यांचे भक्त गण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रेयश भिकाने जेईई' परीक्षेमध्ये देशात १४४९ वा



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३ जून : जगातील अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठेची समजली जाणारी 'जेईई ॲडव्हान्स्ड' परीक्षा उत्तीर्ण होऊन निलंगा येथील श्रेयश नरसिंह भिकाने यानी लक्षणीय यश मिळवले आहे. देशभरातून या परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांमधून श्रेयशने ओबीसी प्रवर्गात 'ऑल इंडिया रैंक' मध्ये १४४९ वे स्थान पटकावले आहे. या यशामुळे त्याचा देशातील नामांकित भारतीय तंत्रज्ञान संस्थेत (आयआयटी) प्रवेश निश्र्चित झाला आहे.

सातत्यपूर्ण अभ्यास आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर श्रेयशने हे यश मिळवले आहे. त्याच्या या यशस्वीते मुळे लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक लौकिकात भर पडली आहे. या यशामागे लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य तलवारे सर,राहुल देशमुख सर,साहू सर,पांडे सर या गुरुजनांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. या यशाबद्दल त्यांचे आजी प्रेमकलाबाई भिकाने,आजोबा प्रा.उद्धवराव भिकाने,वडील मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने,आई वैद्यकीय अधिकारी डॉ उज्वला भिकाने,डॉ यश भिकाने,शिक्षिका अपूर्वा भिकाने यांसह कुटूंबियांनी आनंद व्यक्त केला आहे.

# लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिवादन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी विनम्र अभिवादन केले.

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि ग्रामीण विकासाच्या वाटचालीत अमूल्य योगदान देणारे, जनसामान्यांचे कार्यकुशल नेतृत्व, सामान्यांच्या हक्कासाठी झगडणारा नेता म्हणून स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे योगदान सदैव स्मरणात राहाणारे असून निःस्वार्थ सेवा, जनहिताच्या कामाची वृत्ती व लोकहिताची बांधिलकी ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक आहे.

समाजातील सर्व घटकासाठी काम करणारे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करुन विनम्र अभिवादन केले त्याचबरोबर भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनीही युवा मोर्चाच्या सहकार्यांसमवेत पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केले. अंबाजोगाई रोडवरील आ. कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात अनेकांनी स्व. मुंडे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या अभिवादन कार्यक्रमास आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह युवानेते ऋषिकेशदादा कराड, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. उषाताई संभाजी पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, समाजकल्याण सभापती उत्तमराव माने, जिप सदस्य महादेव साळुंके, रामलिंग शेरे, तानाजी बिराजदार, उमेश उमापुरे, सौ. कविता गुट्टे, सौ. तुळजाबाई लोंढे, सौ. छायाताई चिंचोलकर, रेणापूर पस उपसभापती शरद दरेकर, प्रा. रामेश्र्वर बद्दर यांच्यासह भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नाथसिंह देशमुख, बन्सी भिसे, अनिल भिसे, उद्धव काळे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, राजकिरण साठे, विजय काळे, अमर चव्हाण, उद्धव फड, सौ. ललिता कांबळे, सौ. सुरेखा पुरी, अनुसया फड, बाबासाहेब भिसे, रुपेश काळे, बालाजी शिंदे, सतिष कात्रे, भैरवनाथ पिसाळ, आदिनाथ मुळे, गोपाळ पाटील, चंद्रकांत कातळे, अशोक राठोड, दत्ता सरवदे, ॲड. मनोज कराड, ज्ञानोबा भिसे, भागवत गित्ते, हणमंत गव्हाणे, अनंत पाटील, अशोक सावंत, किरण मुंडे, रमाकांत फुलारी, सिद्धेश्र्वर मामडगे, शिवदास बेद्रे, लक्ष्मण खलंग्रे, भगवान करमुडे, रमेश लहाडे, मेघराज जाधव, शंकर चव्हाण, सचिन लटपटे, ॲड. धनराज शिंदे, सोमनाथ वाघमारे, शुभम खोसे, ॲड, रुपेश थोरमोटे, उमेश सोमानी, प्रशांत शिंदे, ओम चप्पे, चंद्रकांत माने, गणेश चव्हाण, ा, नारायण राठोड, दिपक पवार, किशन क्षिरसागर, व्यंकट रसाळ, ईश्र्वर गोटके, केदार जाधव, दत्ता सप्ताळ, किरण इंगळे, संतोष नरवटे, बालाजी गवळी, निखील धुमाळ, गोपाळ पवार, पद्माकर होळकर, लक्ष्मण मुळे, लिंबराज सोमवंशी, धनंजय पवार, महादेव मुळे, राम पटणे, अच्युत इरपे, शाम भोळे, सुभाष राठोड यांच्यासह अनेकजण होते.

# दुधनाळ येथील श्री शिव महापुराण कथा संपन्न

## पंडित श्री प्रदीप मिश्रा यांच्या अमृतवाणीचा लाभ घेण्यासाठी लाखो भाविकांची अलोट गर्दी





तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि. ३ जून : उमरगा तालुक्यातील दूधनाळ या छोट्याशा गावाने गेल्या सात दिवसांत भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा अद्वितीय सोहळा अनुभवला. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवकथाकार पं. प्रदीप मिश्रा यांच्या अमृतमय वाणीतून झालेल्या शिवमहापुराण कथेची मंगळवार, दि. २ जून रोजी सुमारे पाच लाखांहून अधिक शिवभक्तांच्या उपस्थितीत भक्तिभावपूर्ण वातावरणात सांगता झाली.

दि. २७ मे ते २ जून या कालावधीत आयोजित या भव्य धार्मिक सोहळ्यास महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच सीमाभागातील विविध जिल्ह्यांतून लाखो भाविकांनी हजेरी लावली. अवघी ७०० लोकसंख्या असलेल्या दूधनाळ गावात दररोज भाविकांचा जनसागर उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पं. प्रदीप मिश्रा यांनी आपल्या ओजस्वी प्रवचनातून भगवान महादेवावरील श्रद्धा, विश्र्वास आणि भक्तीचे महत्त्व प्रभावीपणे उलगडून सांगितले. 'एक लोटा जल, एक बेल आणि सर्व समस्यांचे समाधान' हा संदेश देत त्यांनी शिवभक्ती ही केवळ पूजा नसून जीवन जगण्याची पवित्र दिशा असल्याचे प्रतिपादन केले. महादेवाचे नामस्मरण, निस्वार्थ सेवा, मानवतेची जपणूक आणि प्रत्येक जीवावर प्रेम हीच खरी शिवभक्ती असल्याचा संदेश त्यांनी भाविकांना दिला.

उद्योजक राजेंद्र आनंदराव पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित या धार्मिक सोहळ्याने दूधनाळची ओळख राज्याच्या सीमांपलीकडे पोहोचवली. समारोपदिनी महाआरतीनंतर भाविकांच्या डोळ्यांत भक्तीचे अश्रू तर ओठांवर 'हर हर महादेव'चा जयघोष घुमत होता. याप्रसंगी आमदार प्रवीण स्वामी, भाजपचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सात दिवस दूधनाळच्या भूमीत घुमलेले शिवनाम, लाखो भाविकांच्या हृदयात जागवलेली श्रद्धा आणि पं. प्रदीप मिश्रा यांच्या वाणीतून प्रकटलेले शिवतत्त्व हीच या शिवमहापुराण कथेची खरी फलश्रृती ठरली.

### 'संडे ऑन सायकल' मोहिमेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ जून : भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाद्वारे 'खेलो इंडिया' योजनेच्या 'फिट इंडिया' उपक्रमांतर्गत रविवार, ७ जून २०२६ रोजी लातूर शहरात 'संडे ऑन सायकल' या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये तंदुरुस्ती व नियमित व्यायामाचे महत्त्व रुजवण्यासाठी तसेच लठ्ठपणाशी लढण्यासाठी आयोजित केलेल्या या सायकल रॅलीचा मार्ग जिल्हा क्रीडा संकुल येथून सुरू होऊन राजीव गांधी चौक, वाडा हॉटेल, पी.व्ही.आर. चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा जिल्हा क्रीडा संकुल असा निश्र्चित करण्यात आला आहे.

तरी या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील सर्व क्रीडाप्रेमी, नागरिक, सायकलिंग क्लब, शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि खेळाडूंनी ७ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७ वाजता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि या उपक्रमासाठी हींींि://षळींळपवळर.सेीं.ळप/ीश्रव-लळलूलश्रश-वरू या संकेतस्थळावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# तंबाखूमुक्त समाजासाठी जिव्हाळा ग्रुपची जनजागृती मोहीम; व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३ जून :सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या जिव्हाळा ग्रुप, उदगीर यांच्या वतीने जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिनानिमित्त गुरुकृपा हॉटेल, नाईक चौक येथे व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोकराव बिरादार होते. व्यासपीठावर विश्र्वनाथराव मुडपे, डॉ. अनिल भिकाने, प्रा. दिलीप पाटील आणि रमाकांत बनशेळकीकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रमाकांत बनशेळकीकर यांनी उपस्थितांना तंबाखू, गुटखा तसेच सर्व प्रकारच्या मादक पदार्थांच्या सेवनापासून दूर राहण्याची आणि तंबाखूविरोधी जनजागृती अभियानात सक्रिय सहभाग घेण्याची सामूहिक शपथ दिली.

यावेळी विश्र्वनाथ मुडपे यांनी स्वरचित तंबाखूविरोधी प्रबोधनपर जागरगीत सादर केले. तंबाखू खाऊ नका रे भावांनो, आयुष्य वाया घालवू नका रे... या ओळींमधून त्यांनी व्यसनामुळे होणारी वैयक्तिक व कौटुंबिक हानी प्रभावीपणे मांडली.

डॉ. अनिल भिकाने यांनी तंबाखू सेवनामुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांची वैद्यकीय माहिती दिली. तंबाखूमुळे तोंडाचा कर्करोग, फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयविकार, पक्षाघात तसेच प्रजननक्षमतेवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असे सांगून त्यांनी विशेषतः युवकांना या घातक व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

प्रा. दिलीप पाटील यांनी तंबाखूमधील निकोटीन हे अत्यंत व्यसनाधीन करणारे विषारी द्रव्य असल्याचे सांगितले. निकोटीनमुळे व्यसनाची साखळी अधिक मजबूत होत जाते, त्यामुळे तंबाखूचे सेवन टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात अशोकराव बिरादार म्हणाले, व्यसन ही केवळ एका व्यक्तीची समस्या नसून संपूर्ण समाजासमोरील गंभीर आव्हान आहे. व्यसनमुक्त, निरोगी आणि सशक्त समाज घडविण्यासाठी जिव्हाळा ग्रुप यापुढेही आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक जनजागृतीच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत बिडवई यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरिश्र्चंद्र वट्टमवार यांनी केले.

यावेळी जिव्हाळा ग्रुपचे अशोक हाळळे, पांडुरंग बोडके, बाबुराव वाघमारे, डॉ. अशोक दारनुळे, दशरथराव शिंदे, विठ्ठलराव फुलसे, सोपानराव माने, चंद्रकांत रोडगे, शरणप्पा खेळगे, वैजनाथराव पंचगल्ले, चंद्रकांत उप्परबावडे, हावगीराव आचारे, रामराव मोमले, षणमुखानंद मठपती, अमृतराव देशपांडे यांच्यासह अनेक सदस्य व नागरिक उपस्थित होते.

तंबाखूमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जनजागृती आणि सामूहिक सहभाग हाच प्रभावी उपाय असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# उदगीर येथे एस. टी. च्या वर्धापन दिनानिमित्त प्रवासी व कामगारांचा सन्मान




तभा वृत्तसेवा

उदगीर दि.३ जून : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त येथील बसस्टँडवर प्रवासी व कामगारांचा सन्मान करण्यात आला.

आगार प्रमुख पांडुरंग पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी वर्धापनदिनाचे महत्त्व सांगून प्रवाशांनी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधूनच प्रवास करण्याचे आवाहन केले. यावेळी या बस आगाराचे वाहक बाळासाहेब पाटील ,चालक जीलानी सुभेदार यांना लाल परी गौरव रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर तब्बल २५ वर्षे विना अपघात सुरक्षित सेवा केलेलेचालक व्यंकट कवठेकर, बळीराम कार्लेवाड यांच्यासह एस. टी. ने प्रवास करीत असलेल्या प्रवाशांचा व २६० दिवस विना अपघात सेवा केलेल्या १३१ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १५००रु. रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी स्थानक प्रमुख अशोक पवार, कार्यशाळा अधीक्षक पृथ्वीराज कोकाटे, लेखाकार अमित बनसोडे, वरिष्ठ लिपिक दिलीप बिरादार,अनमोल चिंचोले,वाहतूक नियंत्रक माधव गुरधाळकर,तुळशीदास बिरादार, शालीवाहन घोणसे , प्रवासी वाहतूक संघटनेचे सचिव व्ही. एस. कुलकर्णी,सरोजा कुंटे, शेख चांद, शाहूबाई नागमवाड, उषा राठोड,महानंदा शेटकार यांनी पुढाकार घेतला.

### उदयगिरीत अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३ जून : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य अरविंद पाटील एकंबेकर यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत आदरांजली वाहिली. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, दिनविशेष समितीचे प्रमुख डॉ. एम. एस. खांडेकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात अहिल्यादेवींच्या कार्यकौशल्याबद्दल संक्षिप्त माहिती देण्यात आली. प्रत्येक वर्षी अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या निमित्ताने अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांनी क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट यश प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनी रोख रक्कम दोन हजार, शॉल, बुक आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचा संकल्प केला.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

## २६ जणांचे रक्तदान ; सामाजिक उपक्रमांनी राजमातांना अभिवादन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि.३ जून : तालुक्यातील एकूर्का रोड येथे राजमाता पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला तरुणांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात २६ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

माजी सरपंच मुरहरी पेरके यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. 'राजमाता अहिल्याबाई होळकर की जय' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

जयंतीचे औचित्य केवळ उत्सवापुरते मर्यादित न ठेवता, एक कौतुकास्पद सामाजिक उपक्रम येथे राबवण्यात आला. प्रल्हाद शेवाळे, बलभीम जाधव आणि अनिल शेवाळे यांच्या विशेष पुढाकारातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश देत गावातील २६ रक्तदात्यांनी राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेतून रक्तदान केले.

या कार्यक्रमाला सरपंच चंद्रकलाबाई कांबळे, चेअरमन बाळासाहेब जाधव पोलीस पाटील विश्र्वास नरले, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक शिवराज जाधव, माजी सरपंच जगदीश जाधव, माजी चेअरमन चंद्रकांत साळूंके, देविदास जाधव गुरुजी, संजय जाधव गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते डी. आर. जाधव यांच्यासह जिल्हा परिषद शिक्षक बालाजी हंगारगे सर, घंटेवाड सर, सेक्रेटरी रामकिशन जाधव, माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य राजकुमार कांबळे, नितीन गुंडरे, बलभीम जाधव, गीतांजली शेवाळे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी 'राजमाता अहिल्याबाई होळकर सार्वजनिक महोत्सव जयंती समितीच्या' सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. समितीचे सदस्य एकनाथ शेवाळे, प्रल्हाद शेवाळे, निलकंठ शेवाळे, अनिल शेवाळे, अनिल ग. शेवाळे, मोहन शेवाळे, श्रीरंग शेवाळे, नागनाथ शेवाळे, गंगाधर गडदे, नारायण गडदे, संतोष शेवाळे, ज्ञानोबा शेवाळे, संजय शेवाळे आणि गंगाधर शेवाळे यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे हा उत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. या सामाजिक उपक्रमाबद्दल परिसरातून पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर जयंती महोत्सव समितीच्या सदस्यांचे मोठे कौतुक होत आहे. या कार्यक्रमाला गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चैत्यन्य महाराज देगलूरकर यांच्या प्रवचनमालेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ जून : श्रीसद्गुरु सेवा समिती लातूरच्या वतीने ह भ प चैत्यन्य महाराज देगलूरकर यांच्या तिन दिवसाच्या प्रवर्चनमालेच आयोजन करण्यात आल आहे.

श्रीसद्गुरु चैत्यन्य महाराज हे राजा हरिश्चंद्राची कथा सांगणार आहेत. सावेवाडीतील शाम मंगल कार्यालयात ५ जुन ते ७ जुन सायकाळी सहा या वेळेत कथा होणार आहे. चैत्यन्य महाराज यांची आयोध्येत ९ दिवसाची श्रीराम कथा यशस्वी झाली आहे त्या कथेला लातूर जिल्ह्यातुन मोठ्या संख्येने भाविक गेले होते.

रामायण, महाभारत, शास्त्र, पुराण यांचा सुरेख संगम आणि त्याची सुसंगत मांडणी करीत चैत्यन्य महाराज हे विषयाला न्याय देत असतात. अधिक मास आणि दानशुर अशा राजाची कथा ऐकण्याची सुवर्णसंधी लातूरकराना लाभत आहे त्याचा लाभ सर्वांनी प्रामुख्याने तरुण वर्गाने घ्यावा असे अवाहन दिवाण परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



# विविध वृत्त...

## जागतिक पर्यावरण दिनी जिल्ह्यात वृक्षारोपण मोहिमेसह स्वच्छता अभियानाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि.३ जून : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त येत्या ५ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात वृक्षारोपण मोहिमेसोबतच स्वच्छता अभियानही राबविण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये शासकीय यंत्रणांसोबतच स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे. तसेच जिल्ह्यातील घनकचरा व्यवस्थापनासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचेही आवाहन त्यांनी केले आहे.

वृक्षारोपण व स्वच्छता मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात शासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्थांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, सामाजिक वनीकरण विभागाचे उपवन संरक्षक अमितराज जाधव, सहायक वनसंरक्षक मदन क्षीरसागर, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोहन अभंगे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी व नगरपालिका, नगरपंचायतींचे मुख्याधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

घनकचरा व्यवस्थापनाविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनेनुसार लातूर जिल्हास्तरावर आता विशेष कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील घनकचरा व्यवस्थापनाचे थेट संनियंत्रण केले जाईल. महानगरपालिका, नगरपालिका ते थेट ग्रामपंचायत अशा सर्वच स्तरावर घनकचरा निर्माण होणाऱ्या आस्थापना आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी स्पष्ट केले.

येत्या ५ जून रोजी सकाळी लातूर शहरासह जिल्ह्यातील सर्वच नगरपरिषद, नगरपंचायती आणि मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये विशेष स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात यावे. या मोहिमेत शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबतच स्वयंसेवी संस्था व स्थानिक नागरिकांना सक्रियपणे सहभागी करून घेण्यासाठी प्रशासनाने आवाहन करावे. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि वन विभागाने दक्ष राहावे. पर्यावरण संवर्धनाला गती देण्यासाठी जिल्ह्यात 'सिंगल युज प्लास्टिक' वापराला प्रतिबंध करण्याची मोहीम अधिक तीव्र करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. प्रशासकीय स्तरावर या सर्व मोहिमांचे नियोजन करण्यात येत असून, लातूर जिल्हा पर्यावरणपूरक व स्वच्छ बनवण्यासाठी स्वयंसेवी संस्था व पर्यावरण प्रेमी नागरिकांनीही आपले योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## परळकर यांची भारतीय पत्रकार संघाच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी निवड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : समृध्द व्यापारचे संपादक दत्तात्रय गणपतराव परळकर यांची असोसिएशन ऑफ इंडियन जर्नालिस्ट्स (भारतीय पत्रकार संघ - -खग) यांच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भारतीय पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष विक्रम सेन यांच्या निर्देशानुसार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष एम. एस. ग्रेव्ह यांच्या अनुमतीने तसेच लिगल विंगचे प्रदेश अध्यक्ष कैलास पठारे व प्रदेश संघटक अनिल सोनवणे यांच्या सहकार्याने ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

पत्रकारांच्या हक्कांसाठी, संघटनेच्या उद्दिष्टांनुसार तसेच जनहिताच्या प्रश्र्नांवर प्रभावीपणे काम करण्याची अपेक्षा व्यक्त करत संघटनेच्या वतीने दत्तात्रय परळकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

परळकर यांच्या निवडीमुळे लातूर जिल्ह्यातील पत्रकारांना संघटित व्यासपीठ मिळण्यास मदत होईल, तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्र्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. संदीपकुमार जाधव, रविकिरण सूर्यवंशी, गंगाधर डिगोळे, संजय राजुळे, राघवेंद्र देबडवार, विष्णू कळसे, मारोती माने आदी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. समाज माध्यमावरही अभिनंदन होत आहे.

# सत्तेच्या ओघात भाजपाचेही आता काँग्रेसच्याच पाऊलावर पाऊल .. !

**तरूण भारत स्पेशल**
**श्रीधर स्वामी**

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ जून : राजकारणात कधी, काय होईल सांगता येत नाही.आजचे जिवलग मित्र उद्याचे कट्टर शत्रू बनतात तर कट्टर शत्रू जिवलग बनतात. माणसात एवढ्या गतीने विचार आणि मन परिवर्तन करणारे अन्य माध्यम कदाचित विज्ञानाकडेही नसेल. सध्याचे राजकारण तत्वापेक्षा सोयीचे अधिक होताना दिसत आहे. सोय आणि स्वार्थापुढे तत्वाला सहजगत्या तिलांजली देणारे नेते - कार्यकर्ते आजमितीस मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. साधारणतः चार दशकापूर्वी तत्वांना प्राधान्य देऊन चालणाऱ्या भाजपमध्ये मागच्या काही वर्षात आमूलाग्र बदल दिसून येत आहे. सत्तेच्या ओघात भाजपाची नेतेमंडळी चाळीस वर्षांपूर्वी काँग्रेसचे नेते - कार्यकर्ते जसे वागत होते, तसेच किंबहुना त्यांच्यापेक्षा दोन पावले पुढचे वागताना दिसत आहेत. सत्तासुंदरी कोणालाही मोहात पाडून आपल्याला हवेय तसे करून घेते, असे म्हटल्यास ते फारसे अतिशयोक्तीचे होणार नाही.

आजघडीला राजकारणात नैतिकता केवळ शब्दांपुरती मर्यादित राहिली आहे. तत्व आणि नैतिकता जोपासणाऱ्या मंडळींना जणू मूर्ख समजले जाते. भारतीय राजकारणात काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली. चाळीस एक वर्षांपूर्वी भाजपचे वर्चस्व आजच्याएवढे मुळीच नव्हते. काँग्रेस अधिक प्रमाणात सत्तास्थानी राहत असल्याने सगळीकडे त्यांचाच बोलबाला आढळून येत असे. राजकारणात परिस्थिती कायम एकसारखी राहत नसते. चाळीस वर्षांपूर्वी काँग्रेस ज्या स्थानी होती, त्या स्थानी आता भाजप असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ आणखी काही कालखंडानंतर राजकारणातील हे चक्र पुन्हा बदलणार आहेच. बदल हा सृष्टीचा नियम आहे. तो प्रत्येक क्षेत्राला लागू पडतो. काही वर्षांपूर्वी भाजपाला तत्वाने चालणारा राजकीय पक्ष म्हणून ओळखले जात असे. एका मतासाठी पंतप्रधानपद सोडणारे अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारखे महान नेते या पक्षाकडे होते. आजची वास्तव परिस्थिती पाहता राजकारणही परिस्थितीनुरूप बदलत जाते,असे संबोधण्याची वेळ येऊन ठेपली आहे. काळाच्या ओघात केवळ तत्व आणि नैतिकता जोपासण्याऐवजी अन्य मार्गांचा अवलंब करण्याचे काम लिलया केले जात असल्याचे निदर्शनास येते. यामध्ये सर्वच प्रमुख राजकीय पक्षांची मंडळी आली.

भाजपचे प्रस्थ जेव्हा राज्याच्या,देशाच्या राजकारणात वाढायला लागले, तेव्हा लातूरच्या एका ज्येष्ठ काँग्रेस नेत्याने फार बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. भाजपावालेही आता आमच्यासारखीच कामाची पद्धती अवलंबत आहेत, म्हणून ते यशस्वी होत आहेत,असे ते शब्द होते. याचाच अर्थ लोकांना,आपल्या सभोवतीच्या मंडळींना काय हवेय हे ओळखून चालण्याचे काम सध्यस्थितीत प्रत्येक राजकीय पक्षाचा नेता करत असल्याचे निदर्शनास येते. आजमितीस तत्वाने राजकारण केल्यास सत्तासुंदरीला वरने कदापि शक्य नाही हे कोणालाही समजते. साधे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जिंकण्यासाठी काय काय करावे लागते, हे संबंधितांना चांगलेच माहिती आहे. एवढे सगळे करूनही मतदार आपल्याच पदरात मताचे दान टाकतील याची तसूभरही खात्री नाही,असा आजचा काळ आहे.

भाजपमध्ये आजही जनसंघापासून एकनिष्ठ असणारे कार्यकर्ते अस्तित्वात आहेत. त्यांची संख्या कालमानपरत्वे आज कमी आहे, हा भाग वेगळा. मात्र, मूळच्या निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांऐवजी अन्य पक्षातून भाजपात आलेल्या कार्यकर्ते - नेतेमंडळींनाच लाभाच्या पदावर संधी दिली जात असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे निष्ठावंतांचा तिळपापड होतो. पण काहीही झाले तरी त्यांना न्याय मिळू शकत नाही, हेही वास्तव आहे. यामागची कारणे वेगळी आहेत. निवडून येण्याची क्षमता, आर्थिक कुवत या गोष्टी अग्रक्रमाने पाहिल्या जात आहेत. आता राज्यात होऊ घातलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीतही नेमके हाच झाल्याचे पाहायला मिळाले. भाजपने उमेदवारी दिलेल्या नेत्यांपैकी बहुसंख्य नेते कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षातून भाजपात आलेले आहेत. भाजपने किमान एक तरी चेहरा निष्ठावंतांपैकी द्यायला हवा होता,अशा प्रतिक्रिया भाजपच्या निष्ठावंत गोटातून ऐकायला मिळाल्या. पण त्याकडे कोणीही फारसे गांभीर्याने पाहिल्याचे दिसले नाही. त्यावरून सत्तेच्या ओघात भाजपाही आता काँग्रेसच्याच पाऊलावर पाऊल टाकून चालतेय, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

## मुरुड पारुनगर जि. प. शाळेत नववीची तुकडी मंजूर

| धीरज देशमुख यांचा पुढाकार | विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : तालुक्यातील मुरुड येथील पारुनगर जिल्हा परिषद शाळा ही ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये उत्कृष्ट शिक्षणासाठी ओळखली जाते. अखेर या शाळेत इयत्ता नववीची तुकडी मंजूर करण्यात आली आहे. याकरिता माजी आमदार धिरज देशमुख यांनी सातत्याने विशेष प्रयत्न केले होते. मात्र फेब्रुवारी २०२६ पर्यंत नववीची तुकडी मंजूर नसल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये पुढील शिक्षणाबाबत संभ्रम निर्माण झाला होता. ही बाब धिरज देशमुख व आ.अमित देशमुख यांच्या निदर्शनास आल्यानंतर पंचायत समितीचे उपसभापती यांच्या माध्यमातून गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडील प्रस्ताव तातडीने जिल्हा परिषद प्रशासनाकडे पाठविण्यात आला.

पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण तसेच डॉ. दिनेश नवगिरे यांनी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (मा) तृप्ती अंधारे यांची भेट घेऊन या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर प्रशासकीय स्तरावर या प्रस्तावाला गती मिळाली. अखेर इयत्ता नववीची तुकडी मंजूर झाली आहे.

## मोराला पोलीसांनी दिले जीवदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : शहरातील मळवटी रोड परिसरात आज सायंकाळी एक अत्यंत संतापजनक आणि हळहळ व्यक्त करणारी, पण तितकीच दिलासादायक घटना समोर आली आहे. सायंकाळी साधारण ६ वाजताच्या सुमारास या परिसरात एक राष्ट्रीय पक्षी मोर बेशुद्ध अवस्थेत पडला असल्याचे आढळून आले. मात्र, सुजाण नागरिक आणि प्रशासनाच्या तत्परतेमुळे या मोराला वेळेत उपचार मिळून त्याचे प्राण वाचले आहेत.

परिसरात हा मोर बेशुद्ध अवस्थेत पडलेला असताना, तेथून जवळच असलेले 'महाराष्ट्र जीवन'चे संपादक खय्युम शेख यांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यांनी वेळ न घालवता तात्काळ त्या मोराजवळ धाव घेतली. मोराला उचलून सुरक्षित स्थळी आणत त्यांनी प्रथमोपचार म्हणून त्याच्या चारा-पाण्याची व्यवस्था केली. तसेच या घटनेची माहिती तातडीने पोलिसांना दिली.

माहिती मिळताच विवेकानंद पोलीस ठाण्याचे पीआय संतोष पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. पोलीस कर्मचारी दिलीप गोविंदराव राजोळे आणि गोविंद केशव एरनुळे यांनी तत्परता दाखवत मोराला आपल्या ताब्यात घेतले आणि त्याची काळजी घेतली.

## स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाची यशस्वी भरारी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाने पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत एकूण ३६ विद्यार्थ्यांपैकी २४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधिक दृढ झाली असून या गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या परीक्षेत श्रवण तोंडारे याने २३४ गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यापाठोपाठ माही गायकवाड या विद्यार्थीनीने २१८ गुण घेऊन द्वितीय तर सृष्टी लखादिवे या विद्यार्थीनीने २१० गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच विराज शेख २०६, श्रुती सुरवसे१९२, शुभ्रा मोरे १९०, वेदिका सूर्यवंशी १८८, भाग्यश्री बिराजदार १८४, प्राची लहाडे १६०, आरोही कराड १५८, प्राप्ती मुंढे १५६, साईराज विठूबोने १५६, तनिष्का सुरवसे १५४, सई साळुंके १५०, अनुष्का सोमवंशी १५०, सार्थक निरने १५०, आर्यन मगर १४४, राधा डिसले १४४, गौरव सुवर्णकार १४२, शौर्यराणी बनसोडे १४२, विश्र्वजीत जगदाळे १३२, शिवम शेप १३२, सुशांत कोडामंगले १३० आणि शिवप्रसाद करपे १२८ गुण घेऊन गुणवत्तेत यशस्वी भरारी घेत चांगले यश मिळविले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांचे योगदान मोलाचे आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी लातूरच्या कलाधिराज पथकाला ढोल वादनाचा मान




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने दुर्गराज रायगड किल्ल्यावर प्रतीवर्षाप्रमाने ५ व ६ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त रायगडाच्या महा दरवाजा जवळ ढोलवादनाचा मुख्य मान लातूरच्या कलाधिराज प्रतिष्ठानला मिळाला आहे. ५० कलावंताचे हे ढोल ताशा पथक आहे. या शिवराज्याभिषेक सोहळ्याला लातूर जिल्ह्यातून शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन या सोहळ्याचे लातूर जिल्हा समन्वयक सतीश कारंडे यांनी लातूर येथील पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजी राजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. ५ जून रोजी दुपारी साडेतीन वाजता लातूरच्या कलाधिराज पथकाचे ढोल वादन व पूजा होणार आहे. पाचाड येथे राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधी स्थळास अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. त्यानंतर प्रमुख अतिथी रायगडावर पायी प्रस्थान करणार आहेत. नगारखाना येथे गडपूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर ढोलवादन, लेझिम पथक, वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर, जागर शिवशाहीरांचा, शिरकाई देवीचा गोंधळ, युद्ध कलेची प्रात्यक्षिके, ध्वजारोहन, शिवछत्रपतींच्या पालखीचे राजसद्रेवर आगमन, शिवछत्रपतींच्या उत्सव मूर्तीचा युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराज छत्रपती शहाजी राजे यांच्या हस्ते सुवर्णं मुद्रांचा अभिषेक करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महारांजाच्या समाधी स्थळास अभिवादन करण्यात येणार आहे. असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली असून या भव्य दिव्य अशा शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यास शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सतीश कारंडे यांनी केले आहे.

## प्रभाग १६ च्या नगरसेविका राजश्री धोत्रे यांचे सदस्यत्व रद्द करा

# भाजपा कार्यकर्त्यांसह नागरिकांची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : काही महिन्यापूर्वी पार पडलेल्या लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १६ येथून राजश्री धोत्रे निवडून आलेल्या आहेत. मात्र त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून कर्तव्य पार पाडत असताना अक्षम्य दूर्लक्ष करीत सार्वजनीक संपत्ती बळकाविण्याचा प्रयत्न केला असल्याचे आरोप करून त्यांनी केलेल्या या कृतीबद्दल त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी भाजपा कार्यकर्ते प्रशांत गवंडगावे व शितल वाकडे यांनी केली असून याबाबत प्रशासनाकडे सर्व कागदपत्रे पुराव्यानिशी दाखल केलेली आहेत.

लातूर शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १६ब येथून नागरिकांच्या मागास प्रवर्गातून महिलांसाठी राखीव असलीेल्या जागेवरून भाजपाच्या राजश्री धोत्रे-बाहेती या निवडून आल्या आहेत. वास्तविक राजश्री धोत्रे या त्यांच्या पतीच्या कारनाम्यांमुळे चर्चेत राहिलेल्या आहेत. त्यातच आता राजश्री धोत्रे यांचे मनपा सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी भाजपा कार्यकर्ते प्रशांत गवंडगावे व शितल वाकडे यांनी मनपा प्रशासनाकडे विविध कागदपत्रे व पुरावे सादर करून मनपा अधिनियमाच्या विविध कलमानुसार सदर मागणी केलेली आहे.

धोत्रे यांनी आपल्या व पती अंकित बाहेती यांच्या नावे असलेल्या मालमत्ता क्रमांक बी ३/ ३३१९ या ठिकाणी दोन अनाधिकृत नळजोडण्या घेतले असल्याचे मनपाच्या पंचनाम्यात समोर आले आहे. याबाबत त्यांनी कोणताही खुलासा अद्यापपर्यंत सादर केलेला नाही. सदर प्रकरणी राजश्री बाहेती यांनी सार्वजनिक मालमत्तेची चोरी करून कायद्याचे पालन केले नसल्याचे यावरून निष्पन्न होते, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. त्याच बरोबर ३१/३/२०२६ अखेर राजश्री धोत्रे यांच्याकडे २१६०० रुपये पाणीपट्टी येणे बाकी असल्याचे मनपाच्या नोटीसीनुसार निष्पन्न होत आहे. याशिवाय ी धोत्रे व त्यांचे पती अंकित बाहेती यांनी बोगस संयुक्त खरेदी खताद्वारे सार्वजनिक रस्ता विकत घेतल्याचे दाखवून त्यावर अतिक्रमण केले आहे. सदर बाब त्यांनी अवैध व बेकायदेशीरपणे करीत आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग केलेला आहे. या सर्व बाबी लोकप्रतिनिधी म्हणून लोकहीत जोपासणारे नसून राजश्री धोत्रे यांनी मनपा अधिनियमांच्या विविध कलमांचे व कायद्याचे उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे राजश्री धोत्रे यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मनपा प्रशासन आता याबाबत कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून प्रस्ताव आमंत्रित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जून : जिल्ह्यातील सोयाबीन, करडई, तीळ, भुईमूग आणि सूर्यफूल या प्रमुख तेलबिया पिकांच्या शाश्र्वत विकासासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया सन २०२६-२७ अंतर्गत पीकनिहाय मूल्य साखळी भागीदार म्हणून पात्र शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. लातूर जिल्हा तेलबिया समितीमार्फत निवडल्या जाणाऱ्या या भागीदार संस्थांना अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण देणे, प्रमाणित बियाणे वितरण करणे, शेतकरी शेतीशाळा चालवणे, मूल्यसाखळी समूहातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे माती परीक्षण करणे आणि 'कृषी मॅपर' पोर्टलवर लाभार्थ्यांची अचूक माहिती भरणे यांसारखे महत्त्वपूर्ण घटक व उपक्रम राबवावे लागणार आहेत.

या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी इच्छुक कंपन्या किंवा संस्था कंपनी कायदा अथवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक असून, संबंधित तालुक्यात काम करण्याचा त्यांना किमान ३ वर्षांचा अनुभव असावा म्हणजेच त्यांची नोंदणी माहे मार्च २०२३ पूर्वीची असणे बंधनकारक आहे. यासोबतच संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी किंवा सहकारी संस्थेमध्ये किमान २०० शेतकरी सभासद म्हणून नोंदणीकृत असावेत, सहकारी संस्था असल्यास तिच्या उद्दिष्टामध्ये तेलबिया पिकांशी संबंधित कामकाजाचा स्पष्ट उल्लेख असावा आणि मागील ३ वर्षांतील त्यांची सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असावी. शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये शेतकऱ्यांचा किमान ३ लाख रुपयांचा समभाग असावा तसेच कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या, सरकारकडून आधीच अनुदान प्राप्त झालेल्या आणि केंद्र सरकारच्या १० हजार शेतकरी उत्पादक संघ योजनेअंतर्गत किंवा नाफेड व एनएससी-ओएस सारख्या सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत असलेल्या तेलबिया क्षेत्रातील कंपन्यांना या निवड प्रक्रियेत विशेष प्राधान्य दिले जाईल.

जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार रमेश लक्ष्मण आलापुरे, रा. शिवणखेड (बु.), ता. चाकूर जि.लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना बाबळे दगडू राम, रा. शिवणखेड (बु.), ता. चाकूर जि. लातूर यांनी त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची शेतजमीन मोजे. शिवणखेड (बु.), ता.जि. लातूर येथील जमीन गट नंबर २३ मधील एकूण क्षेत्र १ हे. ८४ आर व ०० हे १६ आर पोटखराबा याचा आकार ६ रू. ७८ पैसे असून यापैकी विक्री क्षेत्र शिव रस्त्याच्या लगत लागून ०० हे ८० आर व ४.२० आर पोटखराबासह विक्री करत आहे.

याची चतुः सीमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वस :- बाबळे दगडू राम, पश्र्चिमेस नदी, दक्षिणेस बाबळे दगडू राम व सुरेखा दगडू बाबळे, उत्तरेस : शिव रस्ता येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडून लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडून स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जाखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज,शेजा-याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पाच (०५) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निजोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक ०३/०६/२०२६
तर्फे
ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक,लातूर
मो नं.९४२१९८६४९५

जाहीर प्रगटन देणार
रमेश लक्ष्मण आलापुरे,
रा. शिवणखेड (बु.),
ता. चाकूर जि.लातूर
मो नं. ८९९९० ८४२०९

# परवान्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्री केल्यास कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुन -**

राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवसायासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम, १९६७ अंतर्गत आवश्यक परवाना घेणे बंधनकारक आहे. कोणत्याही व्यापाऱ्याने, संस्थेने, शेतकरी उत्पादक कंपनीने अथवा शेतमाल व्यापाराशी संबंधित इतर घटकांनी आवश्यक परवान्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्याचे पणन संचालक शरद जरे यांनी दिला आहे.

राज्यातील विविध भागांमध्ये अनेक व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणावर शेतमालाची खरेदी-विक्री विनापरवाना होत असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयाला प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या असतानाही काही व्यापारी व संस्था परवान्याविना शेतमाल व्यापार करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. ५ जुलै २०१६ रोजी अध्यादेश क्रमांक १५ राजपत्रात प्रसिद्ध केला असून, त्याच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना ८ जुलै २०१६ रोजी निर्गमित करण्यात आल्या होत्या. तसेच ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानुसार मुख्य अधिनियमाच्या कलम ६ (२) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार कलम ५(ड) अंतर्गत परवाना घेणे आवश्यक राहील; मात्र अशा परवानाधारकांकडून बाजार समितीला कोणतेही बाजार शुल्क आकारता येणार नाही.

कायद्यातील कलम ५(ड) नुसार थेट पणन, खाजगी बाजार शेतकरी-ग्राहक बाजार आणि ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म या प्रयोजनांसाठी परवाने देण्यात येतात.

त्यामुळे शेतमाल व्यापार करणाऱ्या सर्व व्यापारी, संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व अन्य संबंधित घटकांनी कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक परवाने घेऊनच व्यवसाय करावा. अन्यथा त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पणन संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

# किनवटमध्ये पाणंद रस्ते योजनेचा बोजवारा! तहसील समितीची बैठक नाही

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३ जुन -**

मुख्यमंत्री ग्रामीण शेतकरी पाणंद रस्ते योजनेअंतर्गत किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या गप्पा मारणाऱ्या तहसील प्रशासनाचा आणखी एक धक्कादायक कारभार चव्हाट्यावर आला आहे. तलाठी,मंडळ अधिकाऱ्यांनी अहवाल पाठवूनही, तालुक्यात अद्याप संबंधित समितीची एकही बैठक झाली नसल्याची अत्यंत खेदजनक माहिती समोर आली आहे. यामुळे जवळपास १३४ पेक्षा अधिक रस्त्यांच्या योजना केवळ कागदावरच अडकून पडल्या असून, तहसील प्रशासनात फाईल्स धूळ खात पडून आहेत.यात कोठारी ,गोकुंदा, मांडवा, नागझरी, मांडवी परिसर, सारखणी परिसर, बोधडी परिसर या भागातील बहुतांश पांदन रस्ते प्रलंबित . राज्य शासनाकडून महसूल मंत्री योजनांच्या केवळ घोषणा करतात , मात्र स्थानिक महसूल प्रशासन पातळीवर त्यांची अंमलबजावणी करणारी प्रशासकीय यंत्रणा किती सुस्त आहे, याचे हे उत्तम उदाहरण आहे. तालुक्यात १३४ अर्ज आले . हे सर्व पादंन रस्ते प्रशासकीय मंजुरीच्या उंबरठ्यावर आहेत. परंतु, लोकप्रतिनिधीं ,तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठकच न झाल्यामुळे या रस्त्यांना अंतिम मंजुरी मिळू शकलेली नाही. असे तहसील प्रशासनाचे संबधीत कर्मचारी राठोड यानी माहीती दिली आहे.

शासनाच्या योजना फक्त कागदावरच 'मस्त' आणि घोषणाबाजीतच 'व्यस्त' राहणार असतील, तर आम्ही शेती कशी करायची? असा संतप्त सवाल आता किनवटमधील शेतकरी विचारत आहेत.

**पावसाळा तोंडावर; शेतकऱ्यांची चिंता वाढली**

जून महिना सुरू झाला असून पावसाळा अगदी तोंडावर आला आहे. शेतीच्या मशागतीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. अशा वेळी जर पाणंद रस्ते खुले झाले नाहीत, तर बियाणे, खते आणि शेतीची अवजारे शेतापर्यंत कशी न्यायची, या विवंचनेत शेतकरी आहे. एका बाजूला शहर टक्के लोकसहभागातून केवळ एक रस्ता किनवट ते पीपंळगाव कच्चा रसता पूर्ण झाला आहे. . यावरून प्रशासनाला शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी काहीही देणेघेणे नसल्याचे स्पष्ट होत आहे.

**घोषणाबाजी थांबवा, प्रत्यक्ष काम दाखवा!**

शासनाने फक्त घोषणा करून टाळ्या मिळवू नयेत, तर त्या योजनांची अंमलबजावणी स्थानिक प्रशासन वेळेत करते की नाही यावर जिलहाधिकारी प्रशासनाने नियंत्रण ठेवावे. कागदी घोडे नाचवण्यापेक्षा तहसील प्रशासनाने तात्काळ समितीची बैठक लावून हे रस्ते मंजूर करावेत, हीच आमची मुख्य मागणी आहे.

असे मत शेतकरीवर्गात व्यक्त केले जात आहे.

तहसील कार्यालय या प्रकरणात दखल घेऊन वरिष्ठ अधिकारी ही बैठक कधी लावतात आणि शेतकऱ्यांचे रस्ते कधी मोकळे होतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## दिपनगर इरिगेशन कॉलनीतील प्रकाश भांडे बेपत्ता

**नांदेड** -शहरातील दिपनगर परिसरातील इरिगेशन कॉलनीत राहणारे प्रकाश भाऊराव भांडे हे दि. ११ मे पासून बेपत्ता झाले असून याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. दिनांक ११ मे



रोजी प्रकाश भाऊराव भांडे हे आपली सायकल घेऊन नेहमीप्रमाणे मालेगाव रोडवरील कावेरी हॉटेलमध्ये रात्रपाळी कामावर गेले होते. परंतु दि. १२ मे रोजी रात्री पर्यंत देखील ते घरी परतलेच नाही. त्यानंतर दोन- तीन दिवस नातेवाईकांकडे शोध घेतल्यानंतरही ते सापडले नाही. याप्रकरणी त्यांची पत्नी अनिता भांडे यांनी दिलेल्या माहितीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. प्रकाश भांडे यांचे वय ६३ वर्ष असून रंग गव्हाळ तर सडपातळ बांधा आहे. कुणास आढळून आल्यास भाग्यनगर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संध्या छाया वृद्धाश्रम येथे मल्हार वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेतर्फे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जुन -**

मल्हार वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त संध्या छाया वृद्धाश्रम येथे सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वृद्धाश्रमास तीन कपाटांचे वाटप करण्यात आले.

वैद्यकीय प्रतिनिधी व्यवसायामध्ये सततची धावपळ, डॉक्टरांच्या भेटी व औषधांच्या उत्पादनांची माहिती देण्याची जबाबदारी असतानाही संघटनेच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला. जयंतीनिमित्त अनावश्यक खर्च टाळून वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत हा कार्यक्रम साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. वृद्ध आश्रमाचे सचिव सुरेखा पाटणी यांनी विशेष आभार मानले.

या उपक्रमासाठी रवींद्र कोकणे आणि नामदेव होळकर यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमास गोविंद म्हात्रे, शुभम तुपेकर, किरण बंडे आदींची उपस्थिती होती. यावेळी रवींद्र कोकणे यांनी उपस्थितांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा व इतिहासाचा आढावा दिला.

जयंतीनिमित्त नांदेड शहरातील विविध पाच ठिकाणी बॅनर लावून जनतेस शुभेच्छा देण्यात आल्या. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील धनगर समाजातील वैद्यकीय प्रतिनिधींनी ऐच्छिक वर्गणी जमा करून सहकार्य केले. वर्गणी देणाऱ्यांमध्ये किरण बंडे, नामदेव होळकर, रवींद्र कोकणे, संगम डोंगावे आदी उपस्थित होते.

## अजित पेंटे यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर पदावर निवड

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील नवतरुण अजित मनोहर पेंटे यांची भारतीय सैन्य दलाच्या औरंगाबाद आर्मी रिक्रूटिंग कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या सैन्य भरती प्रक्रियेअंतर्गत अग्निवीर(जनरल ड्युटी)पदावर निवड झाल्याची वार्ता रविवार दि.३१ मे



रोजी आदमपूर गावात पोहोचल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले.त्याचदिवशी सैन्य दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर सदरील निकाल जाहीर करण्यात आले होते. येथील अल्पभूधारक शेतकरी मनोहर व्यंकटराव पेंटे व सौ.संगीता मनोहर पेंटे या दांपत्याचे हे द्वितीय चिरंजीव आहेत.आई वडीलांच्या कष्टाची जाण ठेवत अजितने मिळविलेले यश अतिशय मूर्तिमंत असेच ठरले आहे. गाव परिसरातील इतर सैन्य भरतीस उत्सुक युवकांना हे यश निश्चितच प्रेरणादायी ठरेल.गेल्या काही दिवसांपासून मैदानी चाचणीची तयारी त्याने कसून केलेली होती.एकदा सैन्य भरतीत अपयश आल्याने खचून न जाता पुनश्च तयारी करीत अजितने आपल्या यशाचा झेंडा सैन्य भरतीत रोवला आहे.गावातील दिवंगत माजी सुभेदार नागनाथ सावळे त्यानंतर माजी सुभेदार नागनाथ बासरे,सतिश चिगळे (आर्मी),राहूल टेंकाळे (अग्निवीर),लक्ष्मण चिगळे (सीआयएसएफ)श्रीराम चिगळे (सीआरपीएफ)आता अग्निवीर अजित पेंटेसह भारतमातेच्या सेवेसाठी आदमपूर नगरीने योगदान दिल्याचे उत्तुंग समाधान गाव परिसरात आहे. ही सैन्य परंपरा अजुनही वरचेवर यशदायी चढत राहील.या यशाबद्दल जेष्ठ,श्रेष्ठ,आई, वडील,गावातील प्रतिष्ठित नागरिक,ग्राम आजी माजी पदाधिकारी,कर्मचारीवर्ग, व्यावसायिक,पत्रकार,व्यापारी,कंत्राटदार, मित्र परिवाराच्या वतीने अजितचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# नरसी ग्रामपंचायतीच्या जागेवरील कथित अतिक्रमणाविरोधात बेमुदत आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ३ जुन -**

नायगाव तालुक्यातील मौजे नरसी येथील ग्रामपंचायत मालकीच्या गट क्रमांक २२२ व २२३ मधील शासकीय जागेवर कथितरित्या झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते यादव सोनकांबळे यांनी नायगाव तहसीलसमोर दि. १ जून २०२६ पासून बेमुदत अर्धनग्न अवस्थेतील आमरण उपोषण सुरू केले आहे. संबंधित जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

उपोषणकर्ते यादव सोनकांबळे यांनी प्रशासनाकडे दिलेल्या निवेदनात आरोप केला आहे की, नरसी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या गट क्रमांक २२२ व २२३ मधील शासकीय जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून बेकायदेशीर अतिक्रमण करण्यात आले आहे. या जागेवर मोठमोठ्या व्यावसायिक इमारती उभारण्यात आल्या असून त्या भाड्याने देऊन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक लाभ घेतला जात आहे. त्यामुळे शासन व ग्रामपंचायतीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकरणात संबंधित अतिक्रमणधारकांसह तत्कालीन व विद्यमान जबाबदार व्यक्तींनी संगनमत करून शासकीय मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच ग्रामपंचायत



प्रशासनाने वेळोवेळी या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष केल्याने अतिक्रमणधारकांचे मनोबल वाढल्याचेही सोनकांबळे यांनी म्हटले आहे.

उपोषणकर्त्यांनी प्रशासनाकडे केलेल्या मागण्यांमध्ये गट क्रमांक २२२ व २२३ मधील संपूर्ण अतिक्रमणाचे मोजमाप करून ते तात्काळ हटविणे, संबंधित अतिक्रमणधारकांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणे, शासनाची फसवणूक व महसुली नुकसान प्रकरणाची सखोल चौकशी करणे तसेच दोषी आढळणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

दरम्यान, नरसी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवरील कथित अतिक्रमणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून या प्रकरणाकडे तालुका व जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. उपोषणकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, मागण्यांवर ठोस निर्णय होईपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही.

या आंदोलनामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या**

नरसी येथील गट क्रमांक २२२ व २२३ मधील कथित अतिक्रमण तात्काळ हटवावे, संबंधित अतिक्रमणधारकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, शासनाच्या महसुली नुकसानीची चौकशी करावी, दोषी अधिकारी, कर्मचारी व पदाधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, ग्रामपंचायत मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी.

## स्वारातीम' विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर निकालांनंतर गुणपडताळणी

**नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ परीक्षांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून विद्यार्थ्यांसाठी गुणपडताळणी (तशीळषळलरींळेप), उत्तरपुस्तिकेची छायाप्रत (झहेीं ेउेू) आणि पुनर्मूल्यांकन (ठशींरश्रीरींळेप) अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना महाविद्यालयात अर्ज करता येणार आहेत.विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून प्राप्त माहितीनुसार, संबंधित परीक्षांची प्रोव्हिजनल गुणपत्रके (पीडीएफ) ८ जून २०२६ पूर्वी महाविद्यालयांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यानंतर विद्यार्थी ८ जून ते १८ जून २०२६ या कालावधीत आपल्या महाविद्यालयामार्फत गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायाप्रत किंवा पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर करू शकतील. निर्धारित मुदतीनंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त अर्जांच्या शुल्काचा धनाकर्ष (डी.डी.) २० जून २०२६ पर्यंत काढून सर्व अर्ज २२ जून २०२६ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक राहणार आहे.विद्यापीठाने जाहीर केलेल्या शुल्क संरचनेनुसार गुणपडताळणीसाठी प्रति पेपर ७५ रुपये, उत्तरपुस्तिकेच्या छायाप्रतीसाठी प्रति पेपर ३५० रुपये, छायाप्रत मिळाल्यानंतर पुनर्मूल्यांकनासाठी प्रति पेपर १५० रुपये, तर थेट पुनर्मूल्यांकनासाठी प्रति पेपर ३५० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक आवेदनपत्रासाठी १० रुपये स्वतंत्र शुल्क आकारले जाईल.विद्यार्थ्यांनी मागविलेल्या उत्तरपुस्तिकांच्या छायाप्रती संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वेबमेलवर पाठविण्यात येणार असून महाविद्यालयामार्फत त्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातील. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल 'ऑफिस व्हेरिफिकेशन' (जत) मुळे राखीव ठेवण्यात आले आहेत, त्या प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता महाविद्यालयांनी ८ जून २०२६ पर्यंत करावी, असेही विद्यापीठाने कळविले आहे.

दरम्यान, ज्या अभ्यासक्रमांचे निकाल अद्याप जाहीर झालेले नाहीत, त्या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्यानंतर साधारण सात दिवसांच्या आत विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, छायाप्रत व पुनर्मूल्यांकनासाठी ऑफलाइन अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

# मुदखेड तालूक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांवर निसर्गाचा घाला



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३ जुन -**

मुदखेड तालुक्यात वादळी वाऱ्यासह व पावसामुळे मुगट,इजळी, निवघा, शेंबोली, बारड, यासह इतर गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात आतोनात नुकसान झाले असून यामध्ये तालूक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांवर निसर्गाने पुन्हा एकदा घाला घातला आहे. वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दि.३१ मे रोजीच्या वादळ वाऱ्याने मोठा फटका बसला आहे.

यामध्ये मुगट गाव येथील शेतकरी वामण भगवानराव कल्याणे, शंकर तुकाराम कल्याणे, साहेबराव तुकाराम कल्याणे, यांच्या शेत जमीनीत केळीचे पिक घेतले होते ज्यात १६०० झाडे निसवले होते विस ते पंचवीस दिवसात काढण्या लायक होते. परंतु दि.३१ मे रोजी झालेल्या तुफान वादळ वाऱ्यामुळे उपरोक्त झाडांपैकी ४५० झाडे मोडून पडली असल्याने तोंडाशी अलेला घास निसर्गाने हिसकावुन घेतल्यामुळे त्यांच्या कुंटूबाचे आतोनात नुकसान झाले आहे. परिवारांच्या उदरनिर्वाहाचा व मुलांच्या शिक्षणाचा भार पुर्णतः उपरोक्त नुकसान झाल्यामुळे त्यांच्या कुंटूबावर अर्थिक वेळ आली असुन त्यांच्या कुंटूबाला यातुन सावरण्यासाठी तालुक्याचे शासकिय प्रमुख नात्याने जायमोक्यावर जाऊन पंचनामा करून पिकाच्या झालेल्या नुकसानाबद्दल शेतकरी कुंटूबास हातबल होऊ नये व त्यांना संकटातुन सावरण्यासाठी शासकीय मदत देण्यात यावी अशी विनंती नुकसानग्रस्त शेतकरी शंकर कल्याणे गट क्र.६४६ मधील केळीचे ३०० झाडे मोडून पडली आहेत.तर साहेबराव कल्याणे गर क्र.६४६ मधील ३५० झाडे मोडून मोठे नुकसान झाले आहेत.

हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांस तहसीलदार यांनी नैसर्गिक आपत्तीचे गांभीर्य लक्षात घेऊन युद्धपातळीवर कार्यवाही करावी व बळीराजाला दिलासा द्यावा,अशी कळकळीची विनंती अर्ज तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

# बहुजनांच्या उद्धाराचे महान कार्य लोकमाता अहिल्यादेवींनी केले : बालाजी खतगांवकर

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ३ जुन -**

पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ मंदिरांच्या जीर्णोद्धारापुरत्या मर्यादित नव्हत्या, तर त्यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठीही आयुष्य वेचले. घाट, धर्मशाळा, अन्नछत्र, प्रवाशांसाठी निवारा अशा लोककल्याणकारी कामांसोबतच त्यांनी पाण्यातील जीव, जमिनीवरील वासरे आणि आकाशातील पक्ष्यांपर्यंत मानवतेची भावना जपणारे कार्य केले. सर्व जाती-धर्मातील रयतेच्या कल्याणासाठी त्यांनी उभारलेले कार्य आजही प्रेरणादायी आणि आदर्शवत आहे, असे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक व सिने कलावंत बालाजी पेटेकर खतगांवकर यांनी केले.

देगलूर तालुक्यातील शेवाळा येथे पुण्यश्लोक मातोश्री लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. हनुमान मंदिर सभागृहासमोर झालेल्या या कार्यक्रमाला गावासह परिसरातील विविध समाजघटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच शिवकुमार पाटील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विष्णुकांत पाटील, संग्राम पेटेकर (जिल्हाध्यक्ष जय मल्हार सेना), अर्जुन पाटील, प्रकाश पाटील भालेवार (चेअरमन), गोविंद पेटेकर, दिलीप पाटील, समदान देसाई, श्रीकांत पाटील, विठ्ठलराव गारे, सायलू पेंडाळे, नारायण मोतेवार, अर्जुन भालेराव, मारोती गारे, शांतेश्वर पाटील, बालाजी वनलवार, संभाजी पाटील, नागनाथ उसकेलवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी परभणी येथून आलेले हास्यसम्राट तथा झी टीव्ही स्टार सिद्धार्थ खिलारे यांच्या विनोदी कार्यक्रमाने उपस्थितांना अक्षरशः खळखळून हसवले. त्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमात रंगत निर्माण झाली आणि वातावरण आनंदमय झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा मल्हार सेनेच्या कार्यकर्त्यांसह गावातील युवक आणि ज्येष्ठ मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. सर्व जाती-धर्मातील महिला, पुरुष आणि युवकांची लक्षणीय उपस्थिती कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन बालाजी पारसेवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन हणमंत शिवराम राऊलवार यांनी मानले. सामाजिक ऐक्य, मानवता आणि लोककल्याणाचा संदेश देणारा हा जयंती सोहळा शेवाळा परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला.

## शंकरराव रामजी पंदलवाड यांचे शतायुषी निधन

**हिमायतनगर** -हिमायतनगर तालुक्यातील धानोरा (ज.) येथील ज्येष्ठ नागरिक शंकरराव रामजी पंदलवाड (वय १००) यांचे आज दि. ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.१५ वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ते पत्रकार तथा ड. ज्ञानेश्वर पंदलवाड यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे, पणतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर सोमवार दि. १ जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता धानोरा (ज.) ता. हिमायतनगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या निधनाने पंदलवाड कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# जेईई अडव्हांस २०२६ परीक्षेत आयआयबी'चा शानदार निकाल!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुन -**

जेईई अडव्हांस ही देशातील सर्वात प्रतिष्ठित आणि स्पर्धात्मक अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा मानली जाते. भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (IITs) प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण करावी लागते. जेईई मेन परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच जेईई ॲडव्हान्स देण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांच्या संकल्पनात्मक आकलन, विश्लेषण क्षमता, समस्या सोडवण्याचे कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांची कठोर परीक्षा या माध्यमातून घेतली जाते. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे आयआयटीमध्ये प्रवेश घेण्याचे स्वप्न असते आणि त्या स्वप्नपूर्तीकडे जाणारा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे जेईई ॲडव्हान्स परीक्षा होय.

फक्त वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे तर अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांच्या तयारीतही टीम आयआयबीने गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर विद्यार्थी आणि पालकांचा दृढ विश्वास संपादन केला आहे. आयआयबी आहे तर विश्वास आहे, गुणवत्तेचा इतिहास आहे हे ब्रीदवाक्य आज हजारो विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील आयआयबीविषयीच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. पारदर्शकता, शिस्तबद्ध नियोजन, विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे आयआयबीने शिक्षण क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

Since 1999 IIB® INSPIRE • IGNITE • BELIEVE

यावर्षी झालेल्या जेईई अडव्हांस २०२६ परीक्षेत आयआयबीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा साक्ष दिली आहे. विद्यार्थ्यांच्या संकल्पनात्मक आकलनाची, विश्लेषण क्षमतेची आणि समस्या सोडविण्याच्या कौशल्याची कसोटी पाहणारी ही परीक्षा देशातील सर्वात कठीण स्पर्धा परीक्षांपैकी एक मानली जाते. अशा परीक्षेत मिळालेले यश हे विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे प्रतीक मानले जाते.

या यशाबद्दल भावना व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांतील सातत्यपूर्ण अभ्यास, नियमित सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळेच हे यश शक्य झाले. कठोर परिश्रम, योग्य दिशा आणि सकारात्मक वातावरण यांचा संगम झाल्यास कोणतेही ध्येय अशक्य नसते, हे या विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.

**JEE dvanced २०२६ मधील आयआयबीचे यशस्वी विद्यार्थी**

कृष्णा राजेश अग्रवाल (CRL Rank १८६२, Category Rank २१६ - EWS), आयुष गणेश बरगळ (CRL Rank ३२१७, Category Rank ६४९ - OBC), अंजली रविशंकर कुमारी (CRL Rank ११५८७, Category Rank २८७३ - OBC), मुझतबा शहेर अब्दुल समद (CRL Rank १५६१२), उदय विलास भोज (CRL Rank १६३१३, Category Rank ४३०५ - OBC), समर्थ राजीव नाईक (CRL Rank २१४३४, Category Rank ३०९१ - EWS), किशोर भारत दोपेवाड (Prep ST Rank १९५९), दिग्विजय सत्यवान जाधव (Category Rank २९५२), श्रद्धा नरसिंगराव जोरगेवार (Category Rank ५४५४).विनकरे सोहम माधव ५३५५ - Prep SC Rank

# पतीने केला पत्नीचा कुऱ्हाडीने खून

तभा वृत्तसेवा

**पैठण दि ३० :-** पैठण शहरांमध्ये काल रात्री अल्पवयीन मुलाचा खून झाल्याची घटना ताजी असतानाच बुधवारी दि.३ रोजी सकाळी आठ वाजता संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरात झाड झुडपे असलेल्या पाण्याच्या वड्याच्या ठिकाणी पतीने पत्नीवर कुऱ्हाडीने वार करून खून केल्याची गंभीर घटना घडली आहे. पत्नीला कायमचं संपवून आरोपी पती स्वत पोलीस ठाण्यात हजर झाला असून मृत्यू झालेल्या महिलेचे नाव मंदाबाई सुरेश अंगारखे वय ४५ रा. गांगलवाडी ,नारळा पैठण असे आहे.

अधिक माहिती अशीही पैठण शहरातील गांगलवाडी नारळा भागात राहणाऱ्या सुरेश अंगारखे याने बुधवारी रोजी सकाळी आठ वाजता नेहमीप्रमाणे संत ज्ञानेश्वर उद्यानातील झाड झुडपे असलेल्या पाण्याच्या वड्याजवळ लाकडाचे सरपण तोडण्यासाठी हे पती-पत्नी सोबत गेले होते. यावेळी पती सुरेश अंगारखे याने मंदाबाईवर सोबत आणलेल्या कुऱ्हाडीने जोरदार तीन वार करून कायमचं संपविले. पत्नी रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडल्याचं लक्षात येताच आरोपी सुरेश अंगारखे स्वत पोलीस ठाण्यात हजर होऊन पोलिसांना "मी बायकोला कायमचं संपविले" असे सांगितले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग,ऋषिकेश तळेकर, पो.कॉ शुभम पाटील, कल्याण ढाकणे सह पोलीस पथकाने घटनास्थळ पडताळणी करुन पाहणी पंचनामा केला. महिलेचा मृतदेह पैठण येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. यावेळी पोलीस पथकाने ज्या कुऱ्हाडीने पत्नीचा खून केला सदरील कुऱ्हाड जप्त केली. पतीने पत्नीचा खून कोणत्या कारणाने केला या संदर्भात पैठण पोलीस पुढील तपास करीत आहे.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा गळा आवळून खून

तभा वृत्तसेवा



**कन्नड :**दि.०३ जून - तालुक्यातील कळंकी येथील ठाकरवाडी परिसरात चारित्र्याच्या संशयातून पतीने पत्नीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून कन्नड ग्रामीण पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

मृत महिलेचे नाव कांताबाई दगडू मधे (वय ३३, रा. ठाकरवाडी, कळंकी) असे आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी दगडू मधे याला पत्नीच्या चारित्र्याबाबत संशय होता. याच कारणावरून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक तपासातून अंदाज व्यक्त केला जात आहे.

बुधवारी सकाळी दगडू मधे हा पत्नी कांताबाई व दोन लहान मुलांसह दुचाकीवरून गुजरदरीच्या दिशेने निघाला होता. चिवळी घाटातील जंगल परिसरात पोहोचल्यानंतर कांताबाई यांचा दोरीने गळा आवळण्यात आला. या घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर सोबत असलेल्या दोन लहान मुलांनी घाबरलेल्या अवस्थेत गाव गाठत ग्रामस्थांना या प्रकाराची माहिती दिली पण तोपर्यंत उशीर झाला होता काही नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, मुलांनी "वडिलांसोबत एक दाढीवाला माणूसही होता," असे सांगितले आहे. मात्र, या संदर्भात पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. त्यामुळे तपास पूर्ण होईपर्यंत या बाबत स्पष्ट माहिती समोर येणे बाकी आहे.

दरम्यान, घटनेनंतर आरोपी दगडू मधे हा स्वतः कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाला. विलास कडुबा मेंगाळ यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलिस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गिते करीत आहेत.

चार मुलांचे मातृछत्र हरपले

या घटनेमुळे कुटुंबातील चार लहान मुले आईविना पोरकी झाली आहेत. काही दिवसांपूर्वीच कुटुंब धार्मिक कार्यक्रमासाठी एकत्र गेले होते. मात्र, चारित्र्याच्या संशयातून घडलेल्या या घटनेने ठाकरवाडीसह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# पेवर ब्लॉकच्या बिलासाठी 40 हजारांची मागणी; ग्रामपंचायत अधिकारी अडकला

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.०३ जून - तालुक्यातील मक्रणपूर व रेल ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी विजय जोंधळे यांना ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहात पकडल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. या कारवाईमुळे ग्रामपंचायत वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार, ग्रामपंचायत हद्दीत पूर्ण झालेल्या पेवर ब्लॉक कामाचे प्रलंबित बिल मंजूर करून देण्यासाठी संबंधितांकडे विजय जोंधळे यांनी पैशांची मागणी केल्याचा आरोप आहे. याबाबत संबंधित व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीच्या पथकाने नियोजनबद्ध सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारत असताना विजय जोंधळे यांना पथकाने ताब्यात घेतले. कारवाईनंतर अधिकाऱ्यांकडून आवश्यक पंचनामा व इतर प्रक्रिया पार पाडण्यात आल्या. या प्रकरणामुळे कन्नड तालुक्यातील ग्रामपंचायत प्रशासनाच्या कामकाजाबाबत विविध चर्चांना उधाण आले असून, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. ही कारवाई पोलीस निरीक्षक शांतीलाल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात पोलीस हवालदार रविंद्र काळे, विलास चव्हाण, चांगदेव बागुल, रामेश्वर गोरे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

# इंदिरानगर अनमोल खून प्रकरण : आरोपी अटक करा तोपर्यंत अंत्यसंस्कार नाही

तभा वृत्तसेवा



**पैठण दि ०३ :-** इंदिरानगर चाकूने छातीवर सपासप वार करून अल्पवयीन युवकाच्या खुनानंतर मृताच्या नातेवाईकांनी पैठण पोलीस स्टेशन व शासकीय रुग्णालय येथे ठिय्या करून खुनातील आरोपी ईश्वर दगडे याला ताब्यात घेत नाही तोपर्यंत मृत युवकाचे अंत्यसंस्कार करणार नाही असा पवित्रा घेतल्याने परिसरात मोठा तणाव निर्माण होत.पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी खुनातील आरोपी दगडे याला पकडण्यासाठी पथके रवाना केल्याची माहिती मिळाली आहे.

पैठण शहरात इंदिरानगर भागात एका अल्पवयीन मुलाचा भर रस्त्यात धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवार दिनांक २ जून २०२६ रोजी सायंकाळी घडली असून, या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

अनमोल देविदास अहिरे (वय १७, रा. इंदिरानगर, पैठण) हा अल्पवयीन मुलगा तहसील रोडवरील बगळा चौक इंदिरानगर येथील राका कॉर्नर परिसरात रात्री आठ वाजता उभा असताना परिसरातील साईनाथ विकास पवार वय १७ याने त्याच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. यात अमोलच्या छातीवर वार केल्याने तो गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी जखमी अनमोलला उपचारासाठी पैठण येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. या प्रकरणी बुधवारी दुपारी पैठण पोलीस ठाण्यात मुलाच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार खुना सह अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात विकास पवार व साईनाथ पवार या आरोपीना पोलिसांनी अटक केली असून बुधवारी सायंकाळी ४ वाजेपर्यंत खुनातील ईश्वर दगडे या आरोपीला अटक नाही झाल्याने जोपर्यंत आरोपीना अटक होत नाही तो पर्यंत मृत मुलाचे अंत्यसंस्कार करणार नाही असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला आहे.

## शिवसेना गटनेता खुनातील आरोपी....

खून प्रकरणात विकास पांडुरंग पवार, ईश्वर भाऊसाहेब दगडे, साईनाथ विकास पवार सर्व राहणार. इंदिरानगर पैठण तिघांवर कलम १०३ (१) ४९, ५४, ५५, ६० (अ ) भारतीय न्याय सहिंता २०२३ सहकलम तसेच अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी ईश्वर भाऊसाहेब दगडे पैठण नगर परिषद शिवसेना पक्षाचा गटनेता आहे. यात जोपर्यंत दगडे यांना अटक होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाही. असा भूमिका मृत युवकाच्या नातेवाईकांनी घेतली आहे.

# शिवाजी महाविद्यालयाच्या तीन एनसीसी कॅडेट्सची अग्निवीरसाठी निवड



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.०३ जून - शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागाच्या तीन कॅडेट्नी भारतीय सैन्य दलाच्या अग्निवीर भरती प्रक्रियेत यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विष्णू गुंजाळ, दीपक चव्हाण आणि करण गायकवाड या विद्यार्थ्यांची अग्निवीर म्हणून निवड झाली आहे.

एनसीसीमधील प्रशिक्षण, शिस्तबद्ध जीवनशैली आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर या तिन्ही विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या निवडीमुळे महाविद्यालयासह कन्नड शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. विजय भोसले, लेफ्टनंट डॉ. विजय मातकर, प्रा. योगेश सोमवंशी आणि श्याम महाले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सैन्य सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंग पवार, चंद्रकांत देशमुख, डॉ. ए. के. महाले, बाबासाहेब मोहिते, कृष्णा पाटील, आप्पासाहेब देशमुख तसेच मंडळातील सर्व संचालकांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. एनसीसी विभागातून सातत्याने घडणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालयाची वेगळी ओळख निर्माण होत असून, या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही सैन्य सेवेकडे प्रेरणा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# प्रस्तावित देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याबाबत विहिंपची मुख्यमंत्र्यांशी चर्चा



तभा वृत्तसेवा

मुंबई, महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ संदर्भात राज्यातील मंदिरे आणि देवस्थानांच्या भावना शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या शिष्टमंडळाने सोमवारी मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी विविध आक्षेप आणि सूचनांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आले.

विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय संघटन मंत्री मिलिंद परांडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ मधील विविध तरतुदींविषयी मंदिरे, देवस्थाने आणि हिंदू समाजाच्या भावना तसेच चिंता व्यक्त करणारे निवेदन यावेळी मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.

प्रस्तावित कायद्यामुळे देवस्थानांच्या हक्कांवर आणि व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका मांडत या संदर्भातील आक्षेप शासनाने गांभीर्याने विचारात घ्यावेत, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. निवेदनातील मुद्द्यांची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावर योग्य विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.

या शिष्टमंडळात विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्र मंत्री रामचंद्र रामुका, क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे, कोकण प्रांत मंत्री मोहन सालेकर तसेच ॲड. आशीष सोनवणे यांचा समावेश होता.

# श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम येथे अखंड श्रीराम नाम जप व कीर्तन सेवेचे आयोजन भाविक भक्तांनी या सेवेचा लाभ घ्या. आक्का महाराज

तभा वृत्तसेवा



**खुलताबाद, प्रतिनिधी** :दि ३ श्रीक्षेत्र नाथ आश्रम, वेरूळ येथे प.पू. साध्वी सद्गुरू नाथयोगिनी श्री आक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अखंड श्रीराम नाम जप व कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा अधिक ज्येष्ठ शुद्ध ८, शुक्रवार दि. ५ जून २०२६ रोजी प्रारंभ होऊन अधिक ज्येष्ठ शुद्ध १५, शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी सांगता होणार आहे.

या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी आरती, विष्णू सहस्रनाम, हनुमान चालीसा, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन सेवा, भजन आणि रात्री हरिजागर यांसारखे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध भागांतील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व भजन मंडळे या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दि. ५ जून रोजी ह.भ.प. गणेश महाराज नावडे (आळंदी) यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर ह.भ.प. महेश महाराज गलांडे (वेरूळ), ह.भ.प. गोपाळ महाराज ( चिं चो ली ) , ह.भ.प. कृष्णा महाराज चव्हाण (वेरूळ), ह.भ.प. संदीप महाराज पेकळवाडीकर, ह.भ.प. कल्याण महाराज पुंजा (बाजारनगर) आणि ह.भ.प. संतोष महाराज भोसले (गोळेगाव, ता. गंगापूर) यांची कीर्तन सेवा होणार आहे.

सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. अनिल महाराज तुपे (बाभुळगाव, नाशिक) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यास महाराष्ट्रातील विविध भागांतील नाथभक्त, वारकरी, भक्त मंडळ उपस्थित राहून श्रीराम नाम जप, कीर्तन व भजन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु नाथ योगिनी आक्का महाराज व समस्त नाथ भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## यादें मालिकेत कृष्णा भारद्वाजची एन्ट्री

सोनी सब ची यादें मालिका भावनिक कथाकथन, रोचक वैद्यकीय प्रकरणं आणि अनपेक्षित वळणांमुळे प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवते. डॉ. देव मेहता (इक़बाल खान) आणि हॉस्पिटल टीम वेगवेगळ्या अनोख्या वैद्यकीय रहस्यांचा शोध घेत असताना, आता एक नवीन केस सगळ्यांना वास्तव आणि भ्रम यात फरक ओळखायला भाग पाडणार आहे.

# जिल्ह्यातील एचपीव्ही आणि बीसीजी लसीकरणाचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर,दि.३(जिमाका)-"जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थी बालकाला आवश्यक असलेल्या सर्व लसींचे लसीकरण पालकांनी करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एचपीव्ही, पोलिओ, गोवर-रुबेला आणि बीसीजी या लसीकरणाचे सर्व डोस मुलांना वेळेत देण्याचे उद्दिष्ट जिल्हा आरोग्य विभागाने शंभर टक्के पूर्ण करावे," असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय लसीकरण टास्क फोर्स समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्यासह सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी, रोटरी क्लब आणि लायन्स क्लबचे सदस्य उपस्थित होते.

## डेअरी इकोसिस्टमचे पशुधन आधुनिकीकरणावरील सरकारच्या धोरणाला पाठिंबा

छत्रपती संभाजीनगर - भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पशुधन परिसंस्था बळकट करण्यासाठी दुग्ध उत्पादक शेतकरी आणि भागीदारांसोबत केलेल्या कार्यावर आधारित, कारगिलने आज सिंजेंटा फाउंडेशन इंडिया आणि डिजिटल ग्रीन इंडिया यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात एकात्मिक दुग्धविकास उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली. कारगिलच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) आणि शाश्वततेच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आगामी दोन वर्षांत २.३ कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह, हा उपक्रम प्रथम अहिल्यानगर जिल्ह्यात राबविला जाईल (आणि त्यानंतर इतर जिल्ह्यांत विस्तार केला जाईल). अहिल्यानगरमधील राहुरी, राहाता आणि श्रीरामपूर येथील २६ गावांमध्ये पशु आरोग्य मित्र (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून ३,००० हून अधिक शेतकऱ्यांच्या पशुंचे आरोग्य, दुग्ध उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य सुधारणे हा यामागचा उद्देश आहे.

## एआय प्लस स्मार्टफोनची दमदार झेप

**पुणे :** एआय प्लस स्मार्टफोनने मे २०२६ मध्ये ३ लाखांहून अधिक स्मार्टफोन युनिट्सची विक्री करत ₹३५० कोटींहून अधिक महसूल नोंदवून महत्त्वपूर्ण व्यावसायिक टप्पा गाठला आहे. या यशामुळे कंपनीची भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्मार्टफोन ब्रँड्सपैकी एक म्हणून ओळख अधिक मजबूत झाली आहे. भारतीय बाजारपेठेत प्रवेश केल्यानंतर अवघ्या एका वर्षाच्या आत एआय प्लसने ग्राहकांचा विश्वास संपादन करत उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे. सर्वांसाठी सुलभ, नाविन्यपूर्ण आणि मूल्याधारित तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या कंपनीच्या धोरणाला ग्राहकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. एप्रिल २०२६ मध्ये सादर करण्यात आलेल्या नोव्हा२, नोव्हा२ अल्ट्रा आणि नोव्हाफ्लिप या स्मार्टफोन मालिकांनी कंपनीच्या वाढीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अत्याधुनिक फीचर्स, आर्कषक डिझाइन आणि स्पर्धात्मक किंमत यामुळे या उपकरणांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळाली आहे.

# लोकप्रतिनिधीला धमकी; शिवसेनेचा संताप उसळला

## ऋषिकेश जैस्वाल प्रकरणी पोलीस आयुक्तांना निवेदन; महिला अधिकाऱ्यांना शिवीगाळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** शाहगंज परिसरातील अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान शिवसेना नगरसेवक तथा युवासेना मराठवाडा निरीक्षक ऋषिकेश जैस्वाल यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याच्या घटनेने शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणातील आरोपींकडून जैस्वाल कुटुंबीय, मनपा आणि पोलीस विभागातील महिला अधिकाऱ्यांबाबतही आक्षेपार्ह भाषा वापरल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत थेट पोलीस आयुक्तांकडे धाव घेतली.

सोमवारी शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. लोकप्रतिनिधी आणि महिला अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या व शिवीगाळ करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, शाहगंज प्रभागात नागरिकांच्या मागणीनुसार अतिक्रमण हटाव मोहीम राबवित असताना ऋषिकेश जैस्वाल यांना "गोळी मारू", "कापून टाकू" अशा स्वरूपाच्या धमक्या देण्यात आल्या. त्याचबरोबर अत्यंत अश्लाघ्य भाषेत शिवीगाळ करण्यात आली. सार्वजनिक कामे करणाऱ्या लोकप्रतिनिधीला अशा प्रकारे धमकावणे ही लोकशाही व्यवस्थेवरच आघात करणारी बाब असल्याचे शिवसेनेने म्हटले आहे.

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, जैस्वाल कुटुंबीय गेली चार दशके सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून सर्व समाजघटकांमध्ये सलोखा राखण्याचे काम त्यांनी केले आहे. अशा कुटुंबीयांवर आणि कर्तव्य बजावणाऱ्या महिला अधिकाऱ्यांवर अशा पद्धतीने टीका व शिवीगाळ होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

यावेळी शहरप्रमुख विश्वनाथ राजपूत, गटनेते किशोर नागरे, उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत इंगळे, तिलक भुरीवाले, संतोष तळेकर, रेणुका गायकवाड, सुषमा यादगिरे, संगीता बोरसे यांच्यासह शिवसेना, युवासेना व महिला आघाडीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

चौकट, "आज लोकप्रतिनिधी सुरक्षित नसतील, तर नागरिकांचे काय?"

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने गुन्हा दाखल करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. "कर्तव्य बजावणाऱ्या लोकप्रतिनिधीला खुलेआम धमकी देणे आणि महिला अधिकाऱ्यांचा अवमान करणे हा अक्षम्य गुन्हा आहे. आज लोकप्रतिनिधीच सुरक्षित नसतील, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेची हमी कोण देणार?" असा सवाल निवेदनातून उपस्थित करण्यात आला.

**गा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालये, ता. सोगगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 247/2025.

अर्जदार : 1) गोपाल रघुनाथ भुसारे (पाटील) वयः 35 वर्षे, धदाः- शेती. 2) अरूण रघुनाथ भुसारे (पाटील) वयः 33 वर्षे, धंदाः- शेती, दोन्ही रा. उमरविहीरे पो. बहुलखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद. (छत्रपती संभाजी नगर) 3) दिपाली आंनदा पाटील वयः 38 वर्षे, धंदा शेती रा. चिंचखेडे (खु) ता. पाचोरा जि. जळगाव

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत गामे रघुनाथ विष्णु भुसारे हे दिनांक :- 25/04/2017 ला मौजे उमरविहीरे ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) येथे गयत शालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक 6/5/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत था न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदाराना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल,

आज दिनांक 30/4/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

ता. सोयगांव जि. औरंगाबाद

**तुळजापुर येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, तुळजापुर यांच्या न्यायालयात.**

वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स (नियमकम 5. नियम 20)

एच.एम.पी.क. 122/2025 विशाल विरुध्द प्रतिक्षा नि.क. 07

प्रति,

प्रतिक्षा विशाल कारडामे, रा. अणदूर ता. तुळजापूर जि. धाराशिव ह.मु. श्री. सिद्रामप्पा शेटप्पा चिंचुनसुरे रा. कासार - शिरशी ता. निलंगा जि. लातूर मो.नं. 7019273259/7972986340/9730538719/9689188719

ज्याअर्थी अर्जदार विशाल शरणाप्पा कारडामे रा. अणदूर ता. तुळजपूर जि.धाराशिव यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी हया वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक 22/08/2025 रोजी दिवसा 10.30 वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाची उत्तर देवू शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यांत येत आहे कि, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्त ऐवज सादर करावे (काउंटरक्लेम) ज्या दस्त आधारलेला आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम क्लेम) पृष्ठयर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे.

तुम्हास नोटीस देण्यांत येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यांत येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दि. 01/08/2025 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, तुळजापुर

**नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहमदनगर**

(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक) (अवसायनांतर्गत) - बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहिल्यानगर-४१४००१

Email - recovery@nucb.in Website-www.nucb.in, Ph-0241-2343641/42,Fax No.2346951

**विक्री निविदा नोटीस**

सरफेसी ॲक्ट २००२ अंतर्गत मालमत्ता विक्री करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवणे तसेच कर्जदार यांच्यासाठी सूचना सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲण्ड फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट सरफेसी ॲक्ट २००२ नुसार मालमत्तेची विक्री वरील ॲक्ट कलम १३ (१२) नुसार जारी करण्यात आलेल्या सूचनेनंतर खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., (मल्टीस्टेट शेड्युल बँक) अहमदनगर यांच्यावतीने बँकेच्या अधिकृत अधिकारी यांनी सदर ॲक्टच्या कलम ८ व ९ नुसार बँकेची कायदेशीर खर्च इतकी रक्कम कर्जदार / जामीनदार यांच्याकडून वसूल करण्यासाठी खालील नमूद केलेल्या मालमत्तेची 'जशी आहे आणि जिथे आहे ज्या स्थितीत आहे व जे आहे' या तत्त्वावर विक्री करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवित आहे. सदर विक्री सरफेसी ॲक्ट / रुल्स प्रमाणे खालील नमूद केलेल्या अटीनुसार होईल. कर्जदार यांचे अचल मालमत्तेचा तपशील खालील प्रमाणे –

| कर्जदार व जामीनदारांचे नाव, पत्ता व बँकेची शाखा | स्थावर मिळकतीचा तपशील | थकबाकी रक्कम |
|---|---|---|
| शाखा-नेवासा,जि.अहिल्यानगर कर्जदार- मे. यशश्री लेडीज वेअर अँड इमिटेशन ज्वेलरी, प्रो.प्रा.सौ.सुरेखा अजय संचेती जामिनदार- १) सौ.वैशाली अशोक देसर्डा २) श्री.दिनेश विष्णु डोंगरे ३) श्री.काशीनाथ सोपान लिपने | डि. औरंगाबाद आणि सब डि. वैजापूर पैकी वैजापूर येथील लिहून देणार यांची घर जागा मिळकत याचा सि.स.नं.४३५३ , म्युनिसिपल घर नं. १/९४८ चे क्षेत्रफळ १३३.९० चौ मी. हि संपूर्ण मिळकत त्यावरील संपूर्ण बांधकामासह. यासी चतु : सीमा खालीलप्रमाणे : - पूर्व :- वाळकर यांची घर मिळकत पश्चिम:- गुलाबचंद संचेती यांची मालमत्ता दक्षिण:- टिळक रोड उत्तर:- नगरपरिषद रस्ता | १) हायपोथिकेशन लोन रक्कम रु.३०,८३,५३८/- (अक्षरी रु. तीस लाख त्र्याऐंशी हजार पाचशे अडतीस फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याज २) डब्लू सी टी एल रक्कम रु. ४४,५६,१७४/- (अक्षरी रु. चौरेंचाळीस लाख छप्पन्न हजार एकशे चौऱ्याहत्तर फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याज अशी एकूण येणेबाकी रक्कम रु. ७५,३९,७१२/- (अक्षरी रु. पंच्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार सातशे बारा फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याज |

* राखीव किंमत रक्कम - रुपये ९३,२०,०००/- * १०% बयाणा रक्कम रुपये ९,३२,०००/- * बयाना रकमेचा डी.डी. 'नगर अर्बन को ऑप बँक लि.,अहमदनगर' या नावाने अहमदनगर येथे देय असलेला निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक * निविदा अर्ज विक्री - दि.: ०४/०६/२०२६ ते दि.: ०६/०७/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत * निविदा अर्जाची फी-रुपये ५००/- + जीएसटी (विना परतावा) * निविदा अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख: ०७/०७/२०२६ दुपारी ५.०० वाजेपर्यंत * दिनांक : ०४/०६/२०२६ ते दि.: ०७/०७/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० या वेळेत सदरची मिळकत पहावयास मिळेल. * निविदा अर्जासोबत अर्जदाराने त्यांचे आधार कार्ड व पॅन कार्ड (केवायसी) सोबत जोडणे बंधनकारक आहे. * विक्री बाबतच्या अटी व शर्ती प्रधान कार्यालयात पहावयास मिळतील. * निविदा उघडण्याची तारीख - १०/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता, ठिकाण - प्रधान कार्यालय, पानसरे गल्ली, बँक रोड, अहिल्यानगर * कर्ज व मालमत्ते संदर्भातील सर्व कागदपत्र प्रधान कार्यालय, पानसरे गल्ली, बँक रोड अहिल्यानगर येथे पाहण्यास मिळतील.

तारीख : ०३/०६/२०२६

ठिकाण - अहिल्यानगर

प्राधिकृत अधिकारी

नगर अर्बन को. ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक) केंद्रशासनाधिन अवसायानाअंतर्गत

ARL